रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक २९३ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



रायगड, शनिवार, दि. ३० मार्च २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹



चार दशकांपूर्वी राजकारणात महिला सक्रिय नव्हत्या. अशा काळात मीनाक्षी पाटील यांनी समाजकारणासाठी राजकारणाचा वसा उचलला. प्रगल्भ अभ्यास, रोखठोक भूमिका, झुंजार नेतृत्वाच्या जोरावर तिने महाराष्ट्राच्या राजकारणात पाटील कुटुंबाचे नाव उंचावले. मोठी बहीण म्हणून कर्तव्यं पार पाडत असतानाच तिने समाजहिताचे राजकारणही शिकविले. अभ्यास शिबिरात केलेल्या मार्गदर्शनामुळे तिने शेकापचे अनेक कार्यकर्ते घडविले. रायगड जिल्ह्याच्या विकासात तिचे योगदान उल्लेखनीय आहे. अलिबागच्या हिताचे अनेक मोठे निर्णय तिने घेतले. अर्थसंकल्पाबाबतही तिचा प्रचंड अभ्यास होता. मुद्देसूद प्रश्न मांडणे, प्रसंगी मंत्र्यांनाही न घाबरता खडेबोल सुनावून जनतेचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम तिने केले. आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर राजकारणात तिने एक वेगळी पक्कड निर्माण केली. पक्षवाढीबरोबरच अलिबागच्या व रायगडच्या विकासामध्ये तिचे योगदान राहिले आहे. एक बहीण म्हणून कायमच ती पाठीशी राहिली. तळागाळातील घटकाला न्याय देण्याचे काम तिने केले आहे. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने मोठी हानी झाली आहे. तिने बहिणीबरोबरच आईची मायाही केली. आज तिच्या जाण्याने पोरकं झाल्यासारखे वाटत असून, निर्माण झालेली पोकळी न भरुन निघणारी आहे.

– आ. जयंत पाटील, शेकाप सरचिटणीस



मीनाक्षी पाटील यांच्या निधनामुळे रायगडसह संपूर्ण महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. श्रमजीवी व कष्टकऱ्यांचा आवाज गेला आहे. शेवटच्या क्षणापर्यंत मृत्यूशी झुंज देत असतानादेखील कार्यकर्त्यांच्या त्या संपर्कात होत्या. पक्षाशी प्रामाणिक कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे मीनाक्षी पाटील. पक्ष आदेश मानणारे वेगळे व्यक्तिमत्त्व होते. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन केला. त्यांची आठवण संपूर्ण महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. एक लोकाभिमुख, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आपल्यातून आज हरपले आहे.

– माजी आ. पंडित पाटील

मीनाक्षीताई, एक विश्वासू अंदाज
महिला शक्ती भाली शोभे ताज
जरी दूर गेल्या, आपल्यातून आज
याद त्यांची, शेकापवर करील राज
एक विश्वासू अंदाज...

उपज त्यांच्यात महान संस्कारांची
छाप नाना पाटलांच्या आदर्शांची
समृद्धीला जोड अफाट बुद्धीची
दराऱ्यात विधानसभेत कामकाज
एक विश्वासू अंदाज...

प्रा. एल.बी. पाटील, नवघर-उरण

# मुलूखमैदानी तोफ थंडावली...

## माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे निधन

## पेझारीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या झुंजार, लढवय्या नेत्या, अभ्यासू व्यक्तिमत्त्व, भाषा प्रभुत्व, शेकापची मुलुखमैदानी तोफ म्हणून ज्यांचा गौरव व्हायचा अशा माजी आमदार तथा माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि. २९) देहावसान झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर शुक्रवारी मध्यरात्री २ वाजताच्या सुमारास पेझारी–आंबेपूर येथील निवासस्थानी वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच रायगड जिल्ह्यावर शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर आंबेपूर येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील दिग्गज, विविध पक्षांचे नेतेमंडळी, शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, हजारोंचा समुदाय आंबेपूर येथील स्मशानभूमीत त्यांना निरोप देण्यासाठी जमला होता. यावेळी ‘मीनाक्षीताई अमर रहे, लाल बावटे की’ अशा गगनचुंबी घोषणांनी सारा परिसर भारावून गेला होता. दरम्यान, साश्रुनयनांनी मीनाक्षीताईंना अखेरचा निरोप देण्यात आला.

(सविस्तर वृत्त आतील पानांवर)






# मीनाक्षीताई अनंतात विलीन

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती वाऱ्यासारखी पसरली. प्रत्येक कार्यकर्त्याची पावले पेझारीला वळू लागली. अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील नाना पाटील हायस्कूलच्या प्रांगणात त्यांचे पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले. सकाळी सात वाजल्यापासून कार्यकर्ते, वेगवेगळ्या पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मीनाक्षी पाटील यांच्या अंत्यदर्शनासाठी जमू लागले. यावेळी अनेकांचे डोळे पाणावले. ताईंच्या अंत्यदर्शनासाठी सकाळपासूनच प्रचंड गर्दी झाली. नाना पाटील हायस्कूलचा परिसर कार्यकर्त्यांनी बहरून गेला होता. दुपारी दोननंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली. 'मीनाक्षीताई अमर रहे, लाल बावटे की जय' अशा घोषणा देत अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रेत असंख्य नेते, कार्यकर्ते, कष्टकरी, शेतकरी, महिला मोठ्या संख्येने सहभाग झाल्या होत्या.

यावेळी पालकमंत्री उदय सामंत, बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, माजी खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री गणेश नाईक, माजी राज्यमंत्री तथा आमदार रवींद्र पाटील, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, आ. भरत गोगावले, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी, आ. निरंजन डावखरे, आ. महेंद्र दळवी, माजी आ. धैर्यशील पाटील, माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा ॲड. निलीमा पाटील, कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष संजय पाटील, प्रमोद पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, सांगोल्यातील शेकापचे नेते डॉ.बाबासाहेब देशमुख, अनिकेत देशमुख, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, शिशीर धारकर, मिलिंद नार्वेकर, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खैरे, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक, अलिबागचे उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता के.ई. सुखदेवे, थळ येथील आरसीएफचे कार्यकारी संचालक अनिरुद्ध खाडीलकर, उद्धव ठाकरे गटाचे शिवसेना नेते बबन पाटील, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, नारायण डामसे, पिंट्या ठाकूर, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य राजीव साबळे, चंद्रकांत कळंबे, अस्लम राऊत, ज्ञानदेव पवार, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, तालुका प्रमुख शंकर गुरव, अजित पाटील, खालापूरच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, संतोष जंगम, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अध्यक्ष अभिजीत पाटील, नारायण वार्डे, जिल्हा परिषद माजी सदस्य बाळा तेलगे, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक ॲड. गौतम पाटील, वृषाली ठोसर, ॲड. नीलम हजारे, अनिल चोपडा, संजना कीर, काँग्रेसचे राज्य चिटणीस ॲड. प्रवीण ठाकूर, जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, काँग्रेसच्या जिल्हा महिला अध्यक्षा ॲड. श्रद्धा ठाकूर, ॲड. सचिन जोशी, व्यावसायिक केशव पुजारी, मिनीडोअर संघटनेचे जिल्हा अध्यक्ष विजय पाटील, विजय गिदी, मनोज भगत, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद ठाकूर, माजी सदस्य अनिल गोमा पाटील आदी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्राबरोबरच रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी, पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे सर्व कर्मचारी, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे पदाधिकारी, जिल्ह्यातील तालुका चिटणीस, सर्व सभासद, जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, जिल्हा परिषद, महसूल व पोलीस विभागातील अधिकारी कर्मचारी, पेझारीसह आजूबाजूच्या गावांमधील ग्रामस्थ, महिला, पाटील कुटुंबिय, नातेवाईक, सगेसोयरे मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व उपस्थितांनी मीनाक्षी पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करीत आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, नीता पाटील, राजन पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, सुप्रिया पाटील, भावना पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, जिल्हा परिषद अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील यांचे सांत्वन केले.





### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील स्मशानभूमीमध्ये मीनाक्षी पाटील यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या उपस्थितीत रायगड पोलिसांनी बंदुकीची सलामी दिली. त्यानंतर बिगुल वाजवित त्यांना मानवंदना देण्यात आले.

### सोशल मीडियातून श्रद्धांजली

रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रात राजकारणाबरोबरच समाजाकारणात स्वतःचे अस्तित्व निर्माण करणाऱ्या मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती मिळताच अनेकांनी शोक व्यक्त केला. सोशल मीडियाच्या माध्यमातून वेगवेगळ्या ग्रुपमधून त्यांना श्रद्धांजलीचे मेसेज व्हायरल होऊ लागले.

# तडाखेबाज नेतृत्व हरपले!

आजकाल टीव्हीवर विधिमंडळ लाईव्ह पाहण्याची सोय झाली असल्याने अनेक नेते मंडळींची भाषणे पाहायला मिळतात. परंतु, गेल्या पिढीतील केशवराव धोंडगे, दि.बा. पाटील, दत्ता पाटील, एन.डी. पाटील, कृष्णराव धुळप या शेकाप नेत्यांची विधिमंडळातील अभ्यासपूर्ण भाषणे पाहण्याची संधी मात्र आम्हाला मिळाली नाही. विषयाचा सखोल अभ्यास, धारदार वक्तृत्व आणि त्वेषपूर्ण आविर्भाव यामुळे जाहीर सभांमध्येही या नेत्यांची भाषणे ऐकत राहावे वाटे.

आमच्या पिढीतील शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांचेही वक्तृत्व तडाखेबाज आणि ओव्या, काव्य यांनी ओतप्रोत भरलेले असे. आमच्या पिढीला त्यांची अनेक भाषणे ऐकण्याचे भाग्य लाभले. ताई भाषण करायला उभ्या राहिल्या की जणू त्याच्या जिभेवर सरस्वती नांदू लागायची. ताईंचे असेच एक भाषण मला कायम स्मरणात राहिलेय. अलिबागला कोकण मराठी साहित्य संमेलन भरले होते. श्री. मधू मंगेश कर्णिक आदी दिग्गज लेखक उपस्थित होते. उपमा, अलंकार, ओवीबद्ध वाक्यरचना अशा अलंकारांनी नटलेले ते भाषण ताईंच्या आजवरच्या भाषणांमधील सर्वोत्कृष्ट ठरावे.

शेकापच्या जाहीर सभांमधील ताईंची भाषणे मात्र टोकदार, धारदार असत. विविध उदाहरणे देऊन राजकीय विरोधकांना नामोहरम करणारी असत. दत्ता पाटील यांची भाषणे थोडी क्लिष्ट, पण विद्वत्तापूर्ण असायची, तर प्रभाकर पाटील यांची भाषणे सर्वसामान्यांना भावतील, आवडतील अशी असायची. मात्र, मीनाक्षीताईंची भाषणे या दोघांच्या भाषणातील समतोल साधणारी असायची. शेकापने केलेली विकासाची कामे आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांचा नाकर्तेपणा यावर ताई आपल्या खास शेकापस्टाईलने हल्ला चढवायच्या, त्यामुळे त्यांच्या सभेमध्ये टाळ्यांचा अनेकवेळा कडकडाट होई. निसर्गदत्त लाभलेला धारदार आवाज ही ताईंना लाभलेली देणगीच होती. गोरगरीब, पददलितांच्या दुःखावर बोलताना त्यांचा आवाज अतिशय कोमल, मृदू असायचा. विरोधकांवर बोलताना मात्र आपोआप कठोर व्हायचा. विधिमंडळातदेखील त्यांची भाषणे ऐकण्याची संधी मला अनेकदा मिळाली.

मंत्रालयातील मंत्रीगण असो की वरिष्ठ अधिकारीवर्ग असो, ताईंचा जनसंपर्क मोठा होता. आमदार म्हणून आणि मंत्री म्हणूनही शासन व्यवस्थेवर ताईंचा आदरवजा वचक असे. ताईंनी सांगितलेली कुठलेही लोकोपयोगी कामे नोकरशाहीने कधीही नियमांचे कारण सांगून अडवली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आणि जर का कधी दप्तर दिरंगाई झालीच तर, ताईंनी शेकापस्टाईल हिसका दाखवलाच म्हणून समजा!

मी अलिबाग नगरपरीषदेमध्ये बांधकाम सभापती म्हणून काम करताना पालिकेच्या कामांसाठी अनेक वेळा ताईंसोबत मंत्रालयात जात असे. त्यावेळी शिपायापासून ते अगदी सचिवांपर्यंत ताईंना सर्वचजण मानसन्मान, आदर देत असत. अलिबागमधील वाढीव पाण्याची स्कीम केवळ ताईंच्या प्रयत्नांमुळेच साकार झाली. ताई स्वतः आणि मी अनेकवेळा मंत्रालयात या कामासाठी गेलो होतो. अलिबाग शहरासाठी एमआयडीसीकडून पाणी मिळविण्यासाठी मीनाक्षीताईंचे प्रयत्न खूप महत्त्वाचे होते. ताईंच्या पक्ष तत्त्वनिष्ठेचे एक उदाहरण. ताई प्रथमच निवडून आल्या होत्या. विधानसभेमध्ये सेना-भाजपचे सरकार निर्माण होण्याची शक्यता होती.

तत्कालीन भाजपचे महाराष्ट्रातील सर्वेसर्वा मा. गोपिनाथ मुंडे यांचा आग्रह होता की, मीनाक्षीताईंनी मंत्रिमंडळात सामील व्हावे. याविषयी पक्षात अनेक पातळीवर चर्चा चालू होती. परंतु, तत्त्वनिष्ठ मीनाक्षीताई मात्र एकाच निर्णयावर ठाम होत्या की, पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील त्याप्रमाणेच मी वागेन. आणि मग, अनायसा चालून आलेले ते मंत्रीपदाला ताईंनी अशा तऱ्हेने नकार दिला.

या घटनेचा मी अर्थातच साक्षीदार आहे. नंतरच्या टर्ममध्ये मात्र पक्षाच्या निर्णयाप्रमाणे त्या मा. विलासराव देशमुखांच्या मंत्रिमंडळात सामील झाल्या. याहीवेळी पक्षाचा निर्णय शिरोधार्य मानून ताईंनी क्षणार्धात आदेशानुसार मंत्रीपदाचा राजीनामा दिला. सध्याच्या राजकीय बजबजपुरीच्या पार्श्वभूमीवर मीनाक्षीताईंची पक्षनिष्ठा उठून दिसली. अशा नव्या पिढीच्या आदर्श नेतृत्व असणाऱ्या मीनाक्षीताईंना अखेरचा लाल सलाम!

**- सुरेश पाटील,**
**(संस्थापक, आदर्श नागरी पतसंस्था, अलिबाग)**

# जिल्ह्यात ठिकठिकाणी बंद

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील अलिबाग येथील शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी निधन झाले. त्या ७६ वर्षांच्या होत्या. शुक्रवारी दुपारी पेझारी येथे दुपारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाचे वृत्त समजताच अलिबागसह जिह्यातील बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या.

अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या त्या तीन वेळा आमदार होत्या. १९९९ मध्ये तत्कालीन विलासराव देशमुख सरकारमध्ये त्यांनी राज्यमंत्रीपद भूषवले होते. एक अभ्यासू नेत्या अशी त्यांची ख्याती होती.

रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपददेखील त्यांनी भूषविले होते. शेकापचे आ. जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील यांच्या त्या भगिनी होत. तर शेकाप नेते आस्वाद पाटील यांच्या त्या मातोश्री होत. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाबद्दल राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून शोक प्रकट केला जात आहे. एक अभ्यासू नेत्या अशी त्यांची ख्याती होती. शेकापतर्फे रायगडमध्ये अनेक आंदोलने करण्यात आली. त्या प्रत्येक आंदोलनात मीनाक्षी पाटील नेहमीच आघाडीवर राहिल्या. त्यांना श्रद्धांजली म्हणून जिल्ह्याच्या विविध भागातील बाजारपेठा, दुकाने बंद ठेवण्यात आली होती. अलिबाग तालुक्यामध्ये याला चांगला प्रतिसाद मिळाला.




मीनाक्षी पाटील या कोण्या एका जाती-धर्माच्या नव्हत्या. त्यांनी सर्व समाजासाठी आपले जीवन वेचले आहे. याचसाठी सर्व जाती-धर्मातील नागरिकांमध्ये आदराची आणि आपुलकीची भावना होती. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच जिल्ह्याच्या कोनाकोपऱ्यात आयोजित करण्यात आलेल्या राजकीय बैठका, विविध स्पर्धा रद्द करण्यात आल्या आहेत. वाजंत्री क्रीडा नगरी कोकबन येथे क्रीडा स्पर्धा होणार होत्या. त्या रद्द करण्यात आल्या आहेत.सदरच्या स्पर्धा शनिवारी ३० मार्च रोजी पार पडणार आहेत. तसेच लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षाच्या बैठकाही रद्द करण्यात आल्या आहेत.



शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाने शेतकरी, कष्टकरी बांधवांचा बुलंद आवाज हरपला आहे. महाराष्ट्रातील लढवय्या नेत्या आज काळाच्या पडद्याआड गेल्या असून, त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. शेतकरी चळवळीसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केलेल्या मीनाक्षीताईंनी समाजातील उपेक्षित घटकांना न्याय मिळवून दिला. विधिमंडळात त्यांनी विविध प्रश्नांवर आवाज उठवला होता. राज्यमंत्री म्हणून काम करताना सर्वसामान्य माणसांचे प्रश्न मार्गी लावले. रायगड जिल्ह्यात शेकापची ताकद आजही टिकवून ठेवण्यात मीनाक्षीताईंचा मोठा वाटा होता. शेतकरी चळवळीशी त्यांचं अतूट नातं होत. आपले विचार, भूमिका ठामपणे मांडणाऱ्या मीनाक्षीताई सर्वसामान्य जनतेचा आधार होत्या. त्यांचे कार्य, विचार नव्या पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. आज मीनाक्षीताईंच्या निधनामुळे संपूर्ण पाटील कुटुंबीय दुःखात आहेत. मी पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. मी मीनाक्षीताईंना श्रद्धांजली अर्पण करतो.

– विजय वडेट्टीवार, विरोधी पक्षनेते



मीनाक्षीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली आमची राजकीय जडणघडण होत राहिली. एक अभ्यासू, पक्षावर निष्ठा असणारे नेतृत्व म्हणून त्या नेहमीच आम्हाला आदर्श वाटत आल्या. मी अलिबागचा नगराध्यक्ष असताना आमदारकीचा विकासनिधी शहराच्या विकासकामासाठी त्यांनी सुरुवात केली. अलिबाग नगरपालिकेचे संगणकीकरण माझ्याच कार्यकाळात मीनाक्षीताई पाटील यांच्या हस्ते सुरू करण्याची संधी मला मिळाली. ताई यांच्यासमवेत अनेक आंदोलनात सहभागी होता आले. एक प्रभावशाली नेत्या अशी त्यांची अखेरपर्यंत प्रतिमा होती. त्यांची उणीव नेहमीच आम्हाला भासेल.

– सतीश प्रधान,
माजी नगराध्यक्ष, अलिबाग



शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद व वेदनादायी आहे. मीनाक्षीताई पाटील यांनी जनतेच्या प्रश्नावर रस्त्यावर उतरून संघर्ष केला तसेच विधिमंडळातही आवाज उठविला. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यांसाठी झटणारे धडाडीचे नेतृत्व हरपले आहे. मीनाक्षाताई पाटील या लढवय्या नेत्या होत्या. अलिबाग विधानसभा मतदार संघातून त्यांनी तीनवेळा विजय मिळवला होता. विलासराव देशमुख यांच्या सरकारमध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. राजकारणाचे बाळकडू त्यांना घरातून मिळाले होते, राजकारणात येण्याआधी त्यांनी पत्रकार म्हणूनही काम केले आहे. मीनाक्षीताई पाटील या एक अभ्यासू नेत्या होत्या तसेच एक उत्तम वक्त्या होत्या. त्यांचा दांडगा जनसंपर्क, मनमिळाऊ स्वभाव यामुळे सर्वच पक्षात त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी भरीव काम केले आहे. मीनाक्षीताई पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

– नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस

## ध्येयनिष्ठ मशाल विझली

अनाचार, अत्याचार आणि
भ्रष्टाचाराविरूद्धच्या संग्रमात एक
समशेर तळपत होती, तिचं नाव
'मीनाक्षीताई' होतं.
असस्कृतांच्या गर्दीत, अविचारांच्या
वादळांचा सामना करत निष्ठेच्या
गाभाऱ्यात एक पणती तेवत होती,
तिचं नाव 'मीनाक्षीताई' होतं.
शब्दात अंगार होता, मुठीत
एल्गार,
होता मनात तिच्या सावित्रीचा
संस्कार...
झाशीच्या राणीचा जोश मनगटात
होता,
छत्रपतींच्या रायगडाची ती शान
आणि ती क्षितिजावरच्या
प्रभाकराची सुलभ प्रतिमा होती...
'मीनाक्षीताई' महाराष्ट्राची कन्या
होती...
आज आमच्या मार्गदर्शक
मीनाक्षीताईंच्या जाण्याने एक
मशाल विझल्याची जाणीव होत
आहे. मीनाक्षीताई तुम्ही शरीराने
आमच्यातून गेला असाल, मात्र
तुमचे पुरोगामी विचार आमच्या
मनात सतत जिवंत असतील.
तुम्हाला अखेरचा
लाल सलाम!
लाल सलाम !
लाल सलाम !

– गुरुनाथ रामचंद्र साठेलकर

**मीनाक्षी पाटील यांचे वर्णन आजच्या भाषेत तेजतर्रार, तडफदार नेता असेच करावे लागेल. त्या जेव्हा १९९५ मध्ये विधानसभेत आल्या, तेव्हा राजकारण्यांची एक नवी पिढी पुढे येत होती. त्यात मीनाक्षीताई, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आणि त्याहीपेक्षा त्यांच्या समजदार आणि चतुर भाषणांमुळे लक्षात राहात होत्या. त्यांच्या मतदारसंघाशी, अलिबाग तालुक्याशी निगडित अनेक प्रश्नांचा ऊहापोह त्या विधानसभेत करतच असत; पण राज्यातील गरीब, शेतकरी, शेतमजूर आणि पीडितांच्या प्रश्नांवरही त्यांचा आवाज उठत असे. सर्वसामान्यांच्या हितासाठी धडधडणारी तोफ आज थंडावली.**

# शेकापची रणरागिणी

जेव्हा ताई विधानसभेत आल्या, तेव्हा राज्याच्या राजकारणात एक मोठे परिवर्तन घडले होते. त्यावर्षी भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण या दोन मुद्द्यांवर राज्यभरात रान उठवून शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या युतीचे सरकार सत्तेत आले होते. शरद पवार हे राज्याच्या राजकारणात नंतरचे एखाद वर्षच होते. माजी मुख्यमंत्री व तत्कालीन विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतापदावर शरदराव होते. त्यांचा विधानसभेत वावर नव्हता. पवारसाहेबांच्या बरोबरीने काम केलेले मीनाक्षीताईंचे काका दत्ता पाटील हे राजकीय क्षितिजावरून बाजूला झाले होते आणि त्यांच्या पक्षात- शेतकरी कामगार पक्षातही पुढची पिढी कार्यरत होताना दिसत होती.

या बदलत्या वातावरणात ताईंना आपला ठसा उमटवायचा होता. विरोधी पक्षात काम करणे हे काही शेतकरी कामगार पक्षाच्या लोकांना नवीन नव्हतेच. शेकाप दोन वेळाच आजवर सत्तेत सहभागी राहिला. जनता राजवटीतील शरद पवारांच्या 'पुलोद' प्रयोगात त्यांचा सत्तेत प्रत्यक्ष सहभाग होता. गणपतराव देशमुख, एन.डी. पाटील मंत्री झाले होते. १९९९ च्या नंतरच्या दशकात विलासराव देशमुखांच्या पहिल्या शासनकाळात शेतकरी कामगार पक्षाने पुरोगामी लोकशाही आघाडीच्या शासनात सत्तेत थेट सहभाग घेतला होता. यावेळी गणपतरावांच्या बरोबरीने मीनाक्षीताई मंत्रीपदी दिसल्या. पण, तोही काळ अल्पच होता. हे एक-दोन प्रसंग वगळता ताईंनी नेहमीच विरोधी बाकावरूनच संघर्ष केला.

१९९५ ते २०१४ असा पंधरा वर्षांचा कार्यकाळ त्यांना आमदार म्हणून मिळाला. त्या काळात अलिबाग तालुक्याच्या उत्थानाच्या अनेक योजना सरकारकडून मंजूर करून घेण्यात ताईंचा सहभाग होता. सिंहाचा वाटाही होता.

मीनाक्षीताईंचे विधानसभेतील भाषण म्हणजे ऐकणाऱ्यांसाठी साहित्यिक मेजवानीच असे. ताईंना शेकडो कविता मुखोद्गत असत आणि त्यांचे संदर्भ त्या भाषणाच्या विषयाशी लीलया जोडून सहजतेने देत असत. त्यांच्या भाषणात एक लय असे. एक गोडवाही असे. त्यांचे भाषण संबंधित मंत्री तसेच सत्तारूढ पक्षावरचे आणि विरोधा बाकांवरचेही आमदार तल्लीनतेने ऐकत आहेत, असे दृश्य विधानसभेच्या पत्रकार गॅलरीतून अनेकदा पाहता आले.

कृषीवल दैनिकाचा मुंबई प्रतिनिधी म्हणून मी विजयराव मराठे संपादक होते तेव्हापासून काम पाहात होतो. सुरुवातीच्या काळात दत्ता पाटील हे आमदार या नात्याने आम्हाला विधानसभेत भेटत असत. बोलत असत. त्यांच्या नंतर मीनाक्षीताई आल्या. दोघांच्या व्यक्तिमत्त्वात फरक तर होताच. पण, वयातही व त्याहीपेक्षा पिढीचा मोठा फरक होता.

दत्ता पाटील हे जुन्या धाटणीचे नेते होते. त्यांना कोणी काय बातम्या देतोय, कृषीवलने माझे भाषण छापले आहे की नाही, याची चिंता नसायची. ताई या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करत होत्या. त्यांना प्रसार माध्यमांचे महत्त्व जाणवत होते आणि आपले म्हणणे राज्याच्या सर्व विभागात कसे पोहोचले याची खात्री करावी, असे त्यांना वाटत असे. त्यांच्या बरोबरीचे तरूण आमदार आर.आर. पाटील, जयंत पाटील अशा सर्वांच्याच बाबतीत तेच म्हणता येईल. या तरूण आमदारांनी १९९५ नंतरच्या काळात प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव ध्यानी घेऊन कामे केली.

ताई त्या काळात विधानभवनाच्या आवारात, सभागृहाबाहेरच्या पॅसेजमध्ये भेटत. त्यांचे पीए देशमुख हे पत्रकारांना शोधत. सर्व माहिती, भाषणातील मुद्दे पत्रकारांपर्यंत व्यवस्थित पोहोचले पाहिजेत, असा ताईंचा आग्रह असे. तेव्हा दूरदर्शनवर पाच मिनिटे व आकाशवाणीवर पंधरा मिनिटे सभागृहाच्या कामकाजाचे समालोचन प्रसारित होत असे. अनेकदा याची जबाबदारी आठवडाभर माझ्याकडे असे. अनेक आमदारांना तेव्हा आकाशवाणी व दूरदर्शनच्या वार्तापत्रात आपले विषय, आपले म्हणणे आले पाहिजे, असे प्रकर्षाने वाटत असे. कारण, तेव्हा हीच दोन प्रभावी प्रसार माध्यमे होती. नंतरच्या काळता विविध वृत्तवाहिन्यांचे पेव फुटले. समालोचन प्रसारणही थांबले. मात्र, आकाशवाणीवरून अजूनही विधानसभेत दिवसभर काय काय घडले, हे समालोचनाच्या माध्यमातून दिले जाते.

तो सुरुवातीचा, पहिल्या आमदारकीचा काळ ताईंसाठी महत्त्वाचा होता व त्या दूरदर्शन आकाशवाणीबरोबरच छापील वृत्तपत्रांमध्ये काय येते याकडे लक्ष ठेवून असत. त्यांना मदत करण्यासाठी माझ्यासारखे त्यांचे अनेक पत्रकार मित्र पुढे असत, हे विशेष. कारण, ताईंच्या भाषणांतून, चर्चांमधून व त्यांनी विचारलेल्या प्रश्नांमधून चमकदार असे वृत्त सहज हाती येत असे. मीनाक्षीताईंचा जेवणाचा डब्बा हे विधानभवनातील सर्वपक्षीय आमदारांसाठी व मंत्र्यांसाठी एक आकर्षणाचा विषय असे. त्यांच्याकडे सहजच पाच पंचवीस माणसे जेवतील असे डबे असत. माशांचे विविध प्रकार आणि त्यातही रायगडचा प्रसिद्ध जिताडा मासा खाण्यासाठी ताईंकडे आमदारांची, मंत्र्यांची व पत्रकारांचीही फेरी हमखास होत असे. त्यांची मॅजेस्टिक आमदार निवासातील ३१६ क्रमांकाची खोली ही तर ऐतिहासिक वास्तू ठरली पाहिजे! वारसा वास्तू म्हणून जतन केली पाहिजे. पण, आता ते शक्य नाही. कारण, मॅजेस्टीक आमदार निवासाचे आता नव्याने बांधकाम केले जाणार आहे.

३१६ क्रमांकाची खोली हे शेतकरी कामगार पक्षाचे जवळपास मुख्यालय असे, अनेक दशके होते. कारण दत्ता पाटील तिथे राहात. त्यांच्यानंतर ताईंकडे तीच खोली आली होती. तिथूनच शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस झाल्यानंतर जयंत पाटील हे राजकारणाची सूत्रे हलवत असत. त्याच ऐतिहासिक खोलीत विलासराव देशमखांपासून छगन भुजबळांपर्यंतचे नेते फेऱ्या मारत होते व त्यानंतरच विलासरावांच्या नेतृत्वातील १९९९चे आघाडीचे सरकार साकारले होते. त्या सरकारच्या अवतारात ३१६ क्रमांची खोली व जयंत पाटील-मीनाक्षीताई या बहीण-भाऊ नेत्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. खरे तर, ताई व भाईंचे मित्र गोपीनाथ मुंडे हेही होते. जर नारायण राणेंच्याऐवजी मुंडेंच्या नेतृत्वात युतीचे सरकार आले असते, तर कदाचित शेतकरी कामगार पक्षाने, निदान बाहेरून तरी, मुंडेंच्या युती सरकारला पठिंबा दिला असता, इतके पाटील कुटुंबियांचे व मुंडेसाहेबांचे घनिष्ट स्नेहबंध होते. पण, तसे व्हायचे नव्हते. शिवसेना भाजपाच्या अंतर्गत वादात त्यांची युती मागे पडली व विलासराव-छगनरावांच्या आघाडीने पुढे चाल घेतली. ते सरकार स्थापन होत असताना शेतकरी कमगार पक्षाने रायगडच्या राजकारणातील मोठा तिढाही तेव्हा सोडवून घेतला होता व त्यासाठी ते सरकार काहीकाळ अडचणीतही आले होते. सुनील तटकरेंना तेव्हा राज्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. इतका शेकापक्षाचा जोरदार प्रभाव त्या सरकारवर होता. विलासरावांच्या त्या सरकारमध्ये ताई बंदर विकास व मत्स्यव्यवसाय विकास हे महत्त्वाचे खाते सांभाळत होत्या. त्यांच्या मदारसंघासाठी तेच खाते महत्त्वाचे होते व त्यांनी ते मुद्दाम घेऊन कोकणपट्टीचे भले करण्याचा प्रयत्न केला होता. अशी विधानभवनातील बुलंद तोफ वयाच्या पंचाहत्तरीनंतर थंडावली. ताईंना विनम्र आदरांजली..!

**- अनिकेत जोशी, ज्येष्ठ पत्रकार**






## मीनाक्षीताईंचा जीवनप्रवास...

- पोयनाड-आंबेपूर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदापासून राजकीय जीवनास प्रारंभ.
- १९७९ साली जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती
- १९९२ मध्ये वैजाळी मतदारसंघातून जिल्हा परिषद सदस्या.
- १९९२ ते १९९५ जिल्हा परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती.
- १९९५ मध्ये अलिबाग-उरण मतदारसंघातून आमदार म्हणून वर्णी.
- १९८० ते १९९५ यादरम्यान शेकापच्या महिला आघाडीप्रमुख.
- १९९५ मध्ये हौसिंग फायनान्सच्या संचालिका.
- २००० साली पुन्हा आमदार म्हणून निवड.
- १९ ऑक्टोबर १९९९ साली बंदर-खारभूमी मत्स्य विभागाच्या राज्यमंत्री.
- ३० मे २००२ रोजी मंत्रीपदाचा त्याग.
- २००९ साली पुनर्रचित अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघाच्या आमदार.
- २००४ मध्ये एम.एस.सी. बँकेच्या संचालिका.











## माऊली गेली दिगंतीच्या प्रवासाला...





























## दीपस्तंभ

मीनाक्षीताईंच्या जाण्याने एक झंझावात आता निमाला आहे. एक वादळ शांत झाले आहे. जनतेच्या कल्याणाबाबत आतड्यापासून तळमळ असलेली आणि त्यासाठी सदैव लढाईला तयार असलेली एक धगधगती मशाल विसावली आहे. समाजकारण हा एक वसा आहे असे मानणाऱ्या एका ध्येयवादी जीवनाचा अस्त झाला आहे. सत्ताधाऱ्यांना चळाचळा कापायला लावणाऱ्या एका कार्यकर्तीने विराम घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील जनतेशी जिने एक जिव्हाळ्याचे नाते जोडले होते अशी एक मोठी बहीण काळाच्या पडद्याआड गेली आहे. आधीची पिढी सत्तेत होती म्हणून पुढच्या पिढीला अलगद सत्तेत नेऊन बसवणारे राजकारण आज सर्वत्र बोकाळले आहे. मीनाक्षीताईंच्याही घरात दोन पिढ्यांपासून राजकारण व सत्ता होती. पण ते या आजकालच्या राजकारणापेक्षा सर्वस्वी भिन्न होते. जनतेने दिलेली आणि जनतेसाठी राबवायची गोष्ट म्हणजे सत्ता हे या सर्वच पिढ्यांच्या मनात अगदी स्पष्ट होते. आजोबा नारायण नागू पाटलांसाठी सामाजिक काम म्हणजे एका ध्येयवादातून पत्करलेले व्रत होते. पडतील ते कष्ट झेलून ते व्रत चालवण्याची जिद्द त्यांच्यात होती. मीनाक्षीताईंनी हाच वारसा मनोभावे पुढे नेला. तीन वेळा आमदार व एकदा मंत्री या त्यांच्या बायोडेटावरील नोंदी झाल्या. पण त्यांची खरी ओळख ही लढाऊ व अभ्यासू आंदोलक हीच होती. म्हणूनच त्यांच्यावर लिहिलेल्या सर्व लेखांमध्ये रायगडची रणरागिणी असा त्यांचा सार्थ गौरव केलेला आढळतो. ऐन तरुण वयात रस्त्यावर उतरून बेडरपणे त्यांनी आंदोलने केली. आकाशात चंद्र-सूर्य असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही अशी दर्पोक्ति करणाऱ्या स.का. पाटील यांना भर सभेत चले जाव असे सांगण्याचे धाडस त्यांनी दाखवले होते. नंतर एकदा काँग्रेसी मंत्र्यांना शेकापने जिल्हाबंदी केलेली असूनही रत्नाप्पा कुंभार अलिबागेत आले तेव्हा एखाद्या तीराप्रमाणे पोलिस बंदोबस्त भेदून त्यांनी रत्नाप्पांची गाडी रोखली होती. त्यांच्या त्या एका कृतीने कितीएक सामान्य कार्यकर्त्यांना लढण्याचे बळ व प्रेरणा मिळाली असेल याची कल्पना केलेली बरी.

### अभ्यासोनि प्रकटावे

मीनाक्षीताई या रस्त्यावर उतरण्याची धमक दाखवणाऱ्या नेत्या होत्या तशाच त्या अभ्यासू कार्यकर्त्या होत्या. अभ्यासोनि प्रकटावे हा त्यांचा मोठा गुण होता. १९९५ मध्ये त्या पहिल्यांदा आमदार झाल्या तेव्हा त्यांचे काका त्यांना विधिमंडळ ग्रंथालयात घेऊन गेले. त्या ग्रंथालयाला त्यांनी कायमचे आपलेसे केले. त्याचा प्रत्यय त्यांनी आमदार व मंत्री म्हणून बजावलेल्या कामगिरीमध्ये पुरेपूर आला. सभागृहातील कामकाज रात्री कितीही उशिरापर्यंत चालले तरी त्या पूर्ण वेळ सहभागी होत. इतरांच्या चर्चा व भाषणे लक्षपूर्वक ऐकत. त्यातूनच त्यांची स्वतःची भाषणे अतिशय प्रभावी होत गेली. आश्रमशाळांतील मुलींवरच्या अत्याचाराचा प्रश्न एकदा सभागृहात चर्चेला आला. त्यावेळी त्यांचे भाषण नुसतेच डोळ्यात पाणी आणणारे नव्हते तर सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारेही होते. त्यांची दृष्टी व्यापक होती, स्वतःच्या मतदारसंघापुरती मर्यादित नव्हती. त्यामुळे, अलिबागच्या सांबरकुंड धरणाचा प्रश्न त्यांनी जसा लावून धरला तसाच राज्यात नवीन वस्त्रोद्योग धोरण लागू करण्याची आग्रही मागणी केली. कोकणाच्या विकासासाठी त्यांनी तेव्हा मांडलेली एक विस्तृत योजना तर आजही मार्गदर्शक ठरेल अशी आहे. आज अलिबाग हे मुंबईनजीकचे सर्वात लोकप्रिय व गर्दीचे पर्यटनस्थळ झालेले आहे. मात्र असे होऊनही ते बकाल झालेले नाही. याचे श्रेय ज्यांना आहे त्यात मीनाक्षीताईंचा क्रमांक अग्रभागी ठेवावा लागेल. शहरातील रस्त्यांसाठी निधी मिळवण्याबाबत प्रशासनाशी त्यांनी बराच संघर्ष केला. विलासराव देशमुखांच्या मंत्रिमंडळात त्या मंत्री होत्या. पण तेथेही आपला सडेतोड बाणा त्यांनी कायम ठेवला. भरतीच्या वेळी खारे पाणी शेतजमिनीत घुसून त्या खराब होण्याचे प्रमाण रायगडात बरेच आहे. त्याला रोखण्यासाठी विविध ठिकाणी बंधारे घालण्याची गरज होती. ते कामही त्यांना अधिकाऱ्यांशी भांडून करवून घ्यावे लागले. श्रीवर्धन तालुक्यातील दारुबंदी मागणाऱ्या महिलांच्या मागेही ठामपणे उभ्या राहणाऱ्या व मागणी मंजूर करवून घेणाऱ्या मीनाक्षीताईच होत्या.

### निष्ठेशी तडजोड नाही

त्यांची आंदोलने, कामे यांची गणती करताच येणार नाही इतकी मोठी आहे. मात्र त्यांच्या या काही उदाहरणांवर नजर टाकली तरी त्यांनी समाजाच्या किती विविध थरांतील प्रश्नांना स्पर्श केला आहे हे लक्षात येईल. शेतकरी कामगार पक्षाने या कष्टकऱ्यांना एकत्र करून एक पर्यायी राजकारण करण्याचा विडा उचलला व ते अनेक वर्षे यशस्वी करून दाखवले. या यशामध्ये ज्या अनेकांचा वाटा आहे त्यात मीनाक्षीताईंचे नाव वरचे आहे. १९७५ च्या आसपास व नंतर जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने महिलांच्या चळवळीने नवी झेप घेतली. विशेषतः शहरी भागातील महिला आंदोलने बरीच गाजली. पण याच काळात मीनाक्षीताईंसारख्या काही नेत्या स्वतःच्या राजकीय प्रज्ञेने ग्रामीण भागातही तळपल्या व त्यांनी प्रागतिक राजकारणाला मोठी गती दिली. सत्ताकारणामध्ये महिलांना आरक्षण देण्याची अजूनही आपल्याकडे केवळ चर्चाच चालू आहे. पण अशा आरक्षणाची तरतूद नसताना आपल्या कर्तृत्वाने एका जिल्ह्याच्याच नव्हे तर राज्याच्या राजकारणात महत्वाची भूमिका त्यांनी बजावली. कसल्या तरी आमिषाने किंवा पोलिसी कारवाईच्या भीतीने भलेभले राजकारणी कसे झटकन सत्तेच्या वळचणीला जातात हे आपण पाहतो आहोत. विचारसरणी, ध्येयवाद, निष्ठा हे शब्द अशा दलबदलू व विश्वासघातकी नेत्यांनी निरर्थक करून टाकले आहेत. अशा या बजबजपुरीमध्ये तत्वापुढे बाकी सर्व झूठ मानणारे मीनाक्षीताईंसारखे नेते हे दीपस्तंभासारखे असतात. तळाचे कार्यकर्ते व सामान्य जनता यांच्यासाठी त्यांचे जीवन आणि कार्य हे आधार व प्रेरणा देणारे ठरते. अलिकडे प्रकृतीच्या कारणास्तव त्यांचा सार्वजनिक वावर कमी झाला होता. तरीही समाजकारणावर त्यांचे चौफेर लक्ष कायम असे. दैनिक कृषीवल परिवाराशीही त्यांचा विशेष जिव्हाळ्याचा संबंध होता. बातम्या व लेख वाचून त्या कायम प्रतिक्रिया देत वा उपयुक्त सूचना करीत. या नात्याने आम्हा सर्वांसाठीही त्या एक आधारस्तंभ होत्या. मीनाक्षीताईंना विनम्र अभिवादन व अखेरचा सलाम.

आदरांजली

# अजरामर रणरागिणीचा लढा

**शेतकरी कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीशी नेहमीच बांधीलकी मानणाऱ्या ताई आमदार झाल्या, मंत्री झाल्या पण त्यांची नाळ ही नेहमीच कष्टकऱ्यांशी व त्यांच्या विचारांशी बांधली गेली. अगदी मंत्री असतानाही त्यांनी लाल दिव्याच्या गाडीचा कधी आग्रह धरला नाही. खणखणीत आवाज, अभ्यासू वृत्तीमुळे त्यांचे विधानसभेतील भाषण म्हणजे सर्वच सदस्यांसाठी एक प्रकारचे वैचारिक खाद्य ठरत आले आहे. ताईंनी विकासाचा नेहमीच ध्यास घेतला. बंदर व खारभूमी विकास राज्यमंत्री असताना त्यांनी एकदा असेच विकासाच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांच्या दिशेने फाईल भिरकावून संताप व्यक्त केला होता. एका राज्यमंत्र्याने अशा प्रकारे थेट मुख्यमंत्र्यांवरच राग व्यक्त करावा याची चर्चा सर्वत्र झाली. मात्र याचा परिणाम असा झाला की, मीनाक्षीताईंचा मंत्रालयातील दबदबा वाढला. यामुळे त्यांना जनतेच्या हिताची अनेक कामे करता आली. सर्वसामान्यांसाठी झटणारी रणरागिणी अशी त्यांची ओळख कायम राहिली.या रणरागिणीची लढाई अजरामरदेखील झाली.**

**प्रसाद केरकर**

रायगड जिल्ह्यातील एक पुरोगामी व मार्क्सवादी विचारसरणीशी बांधीलकी मानणाऱ्या पाटील घराण्यात त्यांचा जन्म झाल्याने बालपणीच त्यांना कार्ल मार्क्सच्या विचारांचे बाळकडू मिळाले. तरुणपणीच त्यांनी डाव्या विचारसरणीचे जे कंकण बांधले ते आजपर्यंत. शेतकरी कामगार कष्टकऱ्यांच्या चळवळीशी नेहमीच बांधीलकी मानणाऱ्या ताई आमदार झाल्या, मंत्री झाल्या पण त्यांची नाळ ही नेहमीच कष्टकऱ्यांशी व त्यांच्या विचारांशी बांधली गेली. अगदी मंत्री असतानाही त्यांनी लाल दिव्याच्या गाडीचा कधी आग्रह धरला नाही. खणखणीत आवाज, अभ्यासू वृत्तीमुळे त्यांचे विधानसभेतील भाषण म्हणजे सर्वच सदस्यांसाठी एक प्रकारचे वैचारिक खाद्य ठरत आले आहे. ताईंनी विकासाचा नेहमीच ध्यास घेतला, बंदर व खारभूमी विकास राज्यमंत्री असताना त्यांनी एकदा असेच विकासाच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांच्या दिशेने फाईल भिरकावून संताप व्यक्त केला होता. एका राज्यमंत्र्याने अशा प्रकारे थेट मुख्यमंत्र्यांवरव राग व्यक्त करावा याची चर्चा सर्वत्र झाली. मात्र याचा परिणाम असा झाला की, मीनाक्षीताईंचा मंत्रालयातील दबदबा वाढला. यामुळे त्यांना जनतेच्या हिताची अनेक कामे करता आली. सर्वसामान्यांसाठी झटणारी रणरागिणी अशी त्यांची ओळख राज्याला झाली. अधिकाऱ्यांना कधी दमात घेऊन तर कधी त्यांच्याशी विनम्रपणे वागून कामे काढून घेण्याची त्यांची हातोटी अखेरीस अलिबागकरांच्या हिताची ठरली आहे. शेकाप सातत्याने विरोधात राहूनही आपले आमदार असलेल्या मतदारसंघात जास्तीत जास्त निधी आणण्यात यशस्वी ठरला आहे. यामागे त्यांनी सातत्याने केलेला सरकार दरबारी पाठपुरावा व अधिकारी, मंत्र्यांवर ठेवलेला दबाब यामुळे शक्य झाले. यात मीनाक्षीताईनी आमदार झाल्यापासून आघाडी घेतली आहे. ताई पहिल्यांदा आमदार झाल्या. त्यावेळी अलिबागला विकासाची आस लागली होती. ताईंनी रस्ते, दिवे, छत्रपतींचा पुतळा, आंग्रे समाधीचे सुशोभिकरण, हिराकोट तलावाची साफसफाई ही कामे हाती घेऊन अलिबागचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात केली. त्यामुळे अलिबागच्या अनेक भागात रस्ते नव्हते. त्यामुळे रस्ते उभारणीला ताईंनी प्राधान्य दिले, अनेक ठिकाणी रस्ते उभारणे सरकारच्या काही नियमांमध्ये बसत नव्हते तिकडे मंदिरे दाखवून रस्ते उभारणीचा मार्ग मोकळा केला. कारण मंदिरांकडे जाण्यासाठी रस्ते मंजूर करुन मिळत असत. अशा प्रकारे स्थिरे कधी नियमाच्या चौकटीत तर कधी नियमांना मुरड घालून विकासकामे करण्याचा त्यांनी सपाटा लावला.



कायद्याला मुरड न घालता मात्र त्याला व्यवहाराची सांगड घालीत त्यांनी विकास कसा होईल ते पाहिले. अलिबाग, श्रीबाग येथे एम.आय.डी.सी. चा पाणीपुरवठा सुरु केला. अलिबागला जोडून असलेल्या चेंढरे गावातही पाणी योजना आणण्यात ताई यशस्वी ठरल्या. त्यावेळी नगरपालिकांच्या शेजारी असलेल्या गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी सरकारी योजना जाहीर झाली होती. त्यातील पहिली योजना चेंढरे गावात आणण्यात त्यांनी यश मिळविले. अलिबाग-मुरुड हा त्यांचा मतदारसंघ टँकरमुक्त करण्याचे त्यांनी ठरविले आणि ते शक्य करून दाखविले. मीनाक्षीताई बंदर व खारभूमी विकास राज्यमंत्री झाल्या. हे खाते कोकणाच्यादृष्टीने अतिशय महत्वाचे होते. मच्छिमारांचे या भागातील प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या काळात पावले उचलली. करंजा, सातपाटी, मिळकतखार या ठिकाणी लँडिंग सेंटर सुरु केल्याने त्याची कोळी बांधवांना मोठी मदत झाली. वेंगुर्ला हे बंदर स्वातंत्र्यानंतर दुर्लक्षित झाले होते, आपल्या मंत्रीपदाच्या काळात त्यांनी या बंदरातील गाळ काढला. गेल्या ५० वर्षांत कुणीही हा गाळ काढला नव्हता, जलवाहतुकीला प्राधान्य दिले. मांडवा बंदर म्हणून विकसित केले. निवटी येथे मच्छिमारांसाठी जेट्टी उभारली. दोन वर्षांपूर्वी कार्यान्वित झालेल्या वरळी ते बांद्रा या सी लिंकचा प्राथमिक अभ्यास त्या मंत्रीपदी असताना सुरु झाला होता. सांताक्रुझ येथील मच्छिमारांसाठी १६ कोटी रुपये खर्चुन बंधारा बांधला. गुजरातमधून कोकणात आलेल्या मच्छिमारांमुळे इकडाच्या स्थानिक मच्छिमारांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी मीनाक्षीताई स्थानिक कोळी समाजाच्या बाजूने ठामपणे उभ्या राहून त्यांच्या बाजूने आवाज उठविला. त्यांच्या या धोरणाला अनेकांचा विरोध झाला होता. मात्र त्या विरोधाला त्यांनी काही जुमानले नाही. अलिबाग हे पर्यटनाचे मुख्य केंद्र म्हणून विकसित व्हावे व त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार निर्मिती व्हावी यासाठी ताईंनी अनेक योजना आखल्या आणि पूर्णत्वास नेल्या. खारलँडसाठी विशेष निधी मंजूर करून घेण्यात त्या यशस्वी झाल्या.

यातील पहिल्या टप्प्यातील निधी आला देखील आहे. गणेशपट्टी हे गाव नेहमी पाण्याखाली येत असे. या संपूर्ण गावाचे पुनर्वसन करणं है एक मोठे आव्हानात्मक काम होते. परंतु ताईच्या प्रयत्नातून तीनविरे गावाजवळ येथील सर्व १०० टक्के लोकांचे पुनर्वसन करण्यात आले. सर्व पायाभूत सोयी सवलतींनी युक्त असे संपूर्ण गाव नव्याने वसले आहे. संपूर्ण राज्यातील हा एक प्रदूषण हा एक अभिनव प्रयोग होता. कुंडलिका नदीतील प्रदूषण ही एक आणखी मोठी समस्या होती. आता ते पाणी दूर समुद्रात सोडण्यात येते व त्या गावासही शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. आता भविष्यातही अनेक योजना यात प्रामुख्याने वडखळ-अलिबाग चार पदरी मार्ग, साळाव ते मुरूड मार्गाचा विस्तार या प्रमुख कामांचा समावेश आहे. सुमारे ३५ वर्षांच्या आपल्या राजकीय जीवनात मीनाक्षीताईनी एक आदर्श लोकप्रतिनिधी कसा असावा याचा आदर्श घालून दिला आहे.

# स्मरणातील मीनाक्षीताई

**महाराष्ट्र विधान मंडळ अनेक कर्तृत्ववान महिलांनी गाजविले आहे. त्यात अंजनाबाई मगर, मृणाल गोरे, पार्वती परिहार, पारुताई वाघ, पुष्पाताई हिरे, मंगला देशपांडे, प्रतिभाताई पाटील यांसारख्या अनेक महिलांनी आपापल्या परिने महाराष्ट्राच्या विधिमंडळात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. त्यांच्याप्रमाणे मीनाक्षीताई पाटील यांनी सन १९९५ मध्ये प्रथम विधानसभेत निवडून आल्यावर २२ मार्च १९९५ रोजी आमदार म्हणून विधानसभेच्या सार्वभौम सभागृहात शपथ घेताना 'जय जवान, जय किसान' चा नारा दिला. त्यावेळी सारे सभागृह अवाक झाले. त्याचवेळी मीनाक्षीताई सर्वांच्या कुतूहलाचा विषय ठरल्या होत्या.**

**बा.बा. वाघमारे**

१९५७ पासून अलिबाग या मतदारसंघातून ॲड. दत्ता पाटील हे निवडून येत असत. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी, संसदीय कमकाजाचा ज्ञानकोष, विधीज्ज्ञ, विधिमंडळ विषयांचे अभ्यासक अशीच त्यांनी आपली प्रतिमा निर्माण केली होती. त्याच मतदारसंघाची लोकप्रतिनिधी म्हणून तो वारसा मीनाक्षीताई पाटील यांच्याकडे आला होता. दत्ता पाटलांची वारसदारदेखील त्याच तोडीची असल्याची चुणूक ताईंनी पहिल्याच दिवशी दाखविली होती. त्या दिवसापासून ताईंनी सन १९९५, १९९९ व २००९ अशा तिन्ही टर्ममध्ये आपले कर्तृत्व सिद्ध केले. आपल्या अमोघ वाणीने, अभ्यासपूर्ण भाषणांनी विधानसभा गाजविली.



मीनाक्षीताई प्रभाकर पाटील यांचा जन्म १३ सप्टेंबर १९४८ रोजी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील भडवळ येथे झाला. मीनाक्षीताई पाटील यांनी लहानपणीच आपली जीवनरुपी नौका समाजरुपी महासागराच्या उद्धाराकडे वळविली. ताई अत्यंत हुशार, अभ्यासू, प्रचंड वाचन, कमालीची आकलनशक्ती, उत्कृष्ट वक्तृत्व शैली, प्रचंड स्मरणशक्ती, सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या. ताईंना अनेक काव्यपंक्ती, सुविचार, परिच्छेद, अनेक उदाहरणे मुखोद्गत होती. त्यांच्या अमोघ वाणीने त्यांनी समाजमनावर अधिराज्य गाजविले आहे. सुरुवातीच्या काळात ताईंनी आपले वडील प्रभाकर पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पत्रकरिता केली. रायगड जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाची धुरा त्यांनी उत्तम प्रकारे सांभाळली. त्याच वेळी त्यांनी सहकार, शिक्षण, समाजकारण व राजकारण या चारही क्षेत्रात स्वतःला झोकून दिले. हे सर्व करीत असताना ताईंनी १९६२ ते १९८४ या काळात भूविकास बँकेत नोकरी केली. नंतर त्याच बँकेच्या संचालक म्हणून निवडून आल्या. येथूनच त्यांच्या सामाजिक, सहकारी व राजकीय कारकीर्दीस सुरुवात झाली होती.

रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या व अभ्यासू विरोधी पक्षनेत्या म्हणून त्यांनी जिल्हा परिषदेतील आपली कारकीर्द गाजविली. सामाजिक, सहकारी व राजकीय कामामुळे अलिबागच्या जनतेने ताईंना सन १९९५, १९९९ व २००९ अशा तिन्ही वेळच्या विधानसभेच्या निवडणुकीत प्रचंड मताधिक्क्याने निवडून दिले होते.

सन १९९५ मध्ये राज्यामध्ये प्रथमच सत्तांतर झाले होते. अनेक दिग्गज पराभूत झाले होते. अनेक नव्याने निवडून आले होते. त्यात मीनाक्षीताई पाटील या होत्या. पहिल्या दिवसापासून ताईंनी विधानसभेचे कामकाज अतिशय मन लावनू, अभ्यासपूर्वक करण्यास सुरुवात केली होती. २२ मार्च १९९५ रोजी सदस्यांचा शपथविधी देशभक्त रत्नापाण्णा कुंभार अस्थायी अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यानंतर आदरणीय ॲड. दत्ता पाटील मीनाक्षीताईंना विधान मंडळाच्या ग्रंथालयात माझ्याकडे घेऊन आले आणि मला ठणकावून सांगितले,'बाबा, ही माझी मुलगी, आता अलिबागची आमदार म्हणून विधानसभेत निवडून आली आहे. वाचनाची प्रचंड आवड आहे. त्यांना सभागृहाच्या कामकाजात मदत करा. ग्रंथालयातून सर्व संदर्भ उपलब्ध करुन द्या.' त्या दिवसापासून आजपर्यंत आमच्या लाडक्या ताई आमदार मंत्री असतानाही व नसतानाही आमची पुस्तकमैत्री संदर्भ, वृत्तपत्रातील कात्रणे, अनेक विषयांची अद्ययावत माहिती घेणे-देणे आजही अविरतपणे चालू होते.

डिसेंबर १९९५ च्या अधिवेशानत ताईंनी राज्यातील पाटबंधारे खात्याचा अनुशेष भरुन काढण्यासाठी अशासकीय ठराव मांडला. तसेच १५ डिसेंबर १९९५ रोजी मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला चिंतामणराव देशमुख यांचे नाव द्यावे या अशासकीय ठरावावर बोलताना आपल्या भाषणात अनेक संदर्भ देऊन सभागृहाचे लक्ष वेधले होते. १२ डिसेंबर १९९५ रोजी अलिबाग तालुक्यातील साबरकुंड धरणासंबंधी प्रश्न अतिशय आग्रहपूर्वक मांडला. त्यावेळी त्या खूपच अग्रेसीव झाल्या होत्या. २२ डिसेंबर १९९५ रोजी राज्यातील वस्त्रोद्योगासाठी राष्ट्रीय वस्त्रोद्योग धोरण तयार करण्याची आग्रही भूकि घेतली होती. याच अधिवेशनात राज्यातील कृषी विधायक सूचना राज्य शासनाला केल्या. या भाषणातील शेतकऱ्यांवरील केलेल्या काव्यपंक्ती अनेकांचे लक्ष वेधून घेण्यास व काळजावर घाव घालणाऱ्या होत्या.

मीनाक्षीताई पाटील यांनी सभागृहात काम करताना आपल्या अलिबाग मतदारसंघातील बारीक-सारीक प्रश्नदेखील तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला. २५ मार्च १९९८ रोजी कार्लेखिंड ते रेवस रस्ता रुंदीकरण, २७ मार्च १९९८ रोजी अलिबाग ठाणे-तुर्भे रेल्वे मार्गाचे काम, या प्रश्नांना वाचा फोडली. ३० मार्च १९९८ रोजी अलिबाग तालुक्याच्या अशुद्ध पाणी पुरवण्याची लक्षवेधी मांडली. यावेळी संपूर्ण तालुक्याच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी मिळवून घेतली. ३ ऑगस्ट १९९८ रोजी चेंढरे गावास नवी ग्रामपंचायत मंजुरी, २३ जुलै १९९८ रोजी कर्जत तालुक्यातील पाली-भुतवली धरणग्रस्तांना मोबदला मिळावा तसेच बिडवागळे पाझर तलाव पूर्ण करणे हे विषय तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून सोडविले होते.

५ ऑगस्ट १९९८ अलिबाग तालुक्यातील गावांना वीजपुरवठा, १४ डिसेंबर १९९८ राज्यातील आरोग्य सेवा सुधारण्यासाठी नेमलेल्या डॉ. बानू कोयाजी समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी, २४ डिसेंबर १९९८ अलिबाग तालुक्यातील डोंगरी भागाचा उपगटात समावेश करावा, १७ डिसेंबर १९९८ रोजी ताईंनी नवीन महिला धोरणावरील भाषण केले. हे भाषण सर्वांचे लक्ष वेधणारे व महिलांच्या समस्यांना वाचा फोडणारे अतिशय अभ्यासपूर्ण होते. ताईंनी ७ डिसेंबर २००२ रोजी कायदा सुव्यवस्थेवर अतिशय चांगले भाषण केले. ते खूपच दिशा देणारे होते. ऑक्टोबर १९९९ ते जून २००२ या काळात ताईंनी मत्स्यव्यवसाय व बंदरे खात्याच्या राज्यमंत्री म्हणून अतिशय चांगले काम केले. अनेक लोकोपयोगी निर्णय त्यांनी घेतले होते. ताईंनी विधानसभेचे सदस्य व राज्यमंत्री म्हणून केलेले काम सर्वांना मार्गदर्शक आहे. विधानसभेतील त्यांची अतिशय अभ्यासपूर्ण भाषणे नवीन आमदारांना सभागृहातील कामकाजासाठी दिशा देणारी आहेत. त्यांचा प्रेमळ स्वभाव, अभ्यासूपणा, कार्यक्षम व आदरयुक्त बोलणे हे आयुष्यभर स्मरणात राहणारे ठरले.

# बुलंद तोफ निमाली

**रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या माजी अध्यक्षा, शेतकरी कामगार पक्षाच्या अलिबाग-उरण विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार, माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांचा लाभलेला सहवास आयुष्याला वेगळी कलाटणी देणारा ठरला. त्यांच्या सानिध्यात राहून अनुभवलेल्या निर्भीड पत्रकार ते मंत्रीपदावर विराजमान झालेल्या रायगडच्या रणरागिणी असा त्यांचा आतापर्यंतच्या राजकीय जीवनप्रवासाचा मांडलेला हा धांडोळा.**



**नागेश कुळकर्णी**

कृषीवलमध्ये १९८० च्या सालापासून अलिबाग प्रतिनिधी म्हणून मी अनेक वर्षे काम केले. तेव्हापासून आ. मीनाक्षीताई पाटील यांना जवळून ओळखता आले. त्यांनी कृषीवलमध्ये विविध विषयांवर विपुल प्रमाणात लिखाण केले आहे. याआधीचे कृषीवलचे तत्कालिन संपादक आणि रायगड जिल्ह्यातील श्रमजीवी जनतेचे नेते प्रभाकर पाटील यांच्याप्रमाणेच वेळोवेळी आमदार मीनाक्षीताईंचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्याचमुळे मला रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघात गेली ४० वर्षे काम करण्याची संधी मिळाली. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघात सहचिटणीस, सरचिटणीस, खजिनदार आणि आता उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहे.

आमदार मीनाक्षीताई पाटील या रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाशी गेल्या अनेक वर्षांपासून संबंधित आहेत. पत्रकार संघाचे आतापर्यंत विष्णुभाऊ मंडलिक, नवीन सोष्टे असे अध्यक्ष झाले. सध्या सुप्रिया पाटील या विद्यमान अध्यक्षा आहेत. यातील प्रत्येक अध्यक्षांनी आपापल्या परीने पत्रकार संघाची व्याप्ती वाढविणे, पत्रकारांना न्याय मिळवून देणे, विविध उपक्रम राबविणे, विविध लोकोपयोगी कामांचा पाठपुरावा केला. एवढेच नव्हे तर, आपल्या कर्तबगारीचा वेगळा ठसा उमटविला आहे. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाची सूत्रे आमदार मीनाक्षीताई पाटील यांनी १९७५ साली हाती घेतली आणि आपल्या कारकीर्दीत पहिला पत्रकार दिन साजरा केला, तो अलिबाग तालुक्यातील डोंगराळ भागात वसलेल्या वाघोडे गावाच्या आदिवासीवाडीत.

पुढे कनकेश्वर येथेही पत्रकार दिनाचा कार्यक्रम पार पडला. नंतर रायगड जिल्हा परिषदेच्या अलिबाग येथील सभागृहात पत्रकार दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर मात्र रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या रामनारायण पत्रकार भवनात दरवर्षी सातत्याने पत्रकार दिनाचा कार्यक्रम होत आहे. या कार्यक्रमास आतापर्यंत अनेक मान्यवरांना प्रमुख पाहुणे, महनीय वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. त्यात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी, ज्येष्ठ पत्रकारांचा समावेश आहे. आमदार मीनाक्षीताई पाटील यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत सहकार, आदिवासींचे सामूहिक विवाह, सीमालढ्यात सहभाग, छत्रपती शिवाजी महाराज त्रितशताब्दी पुण्यतिथी विशेषांकाचे रायगडावर प्रकाशन, श्रीमंत रमाबाई पेशवे यांनी हरिहरेश्वर येथे सुरू केलेला सनई चौघडा मध्यंतरी एक वर्ष बंद पडला होता. तो पत्रकार संघाने पूर्ववत सुरू केला. जिल्ह्यातील औद्योगिक परिसरातील कामगारांचे प्रश्न सोडविणे, कुष्ठरोग निवारण कार्यात हातभार, तसेच इतर उपक्रम राबवून पत्रकार संघाने रायगड जिल्ह्यात वेगळे स्थान निर्माण केले आहे.रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर आमदार मीनाक्षी पाटील यांनी 'कुलाबा समाचार' चे संपादक रामभाऊ मंडलिक आणि 'कृषीवल' चे संस्थापक नारायण नागू तथा आप्पासाहेब पाटील यांच्या स्मरणार्थ रामनारायण पत्रकार भवन बांधण्याचा संकल्प सोडला होता. याकामी स्व. प्रभाकर पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. खरे म्हणजे, पत्रकार भवन उभे राहावे, ही प्रभाकर पाटील यांची इच्छा होती.

पत्रकारांवर अन्याय करणाऱ्या बिहार प्रेस विधेयकाच्या विरोधात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने उभारलेल्या आंदोलनात आमदार मीनाक्षी पाटील या सहभागी झाल्या होत्या. १३ सप्टेंबर १९८२ रोजी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर येथे बिहार सरकारच्या विरोधात वृत्तपत्र विधेयकाचा निषेध करण्यासाठी मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी बंदीहुकूम मोडल्याच्या आरोपावरून महाराष्ट्राच्या ८४ पत्रकारांना शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्यात आमदार मीनाक्षी पाटील या एकमेव महिला पत्रकार होत्या.

विशेष म्हणजे, १९८२ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रभर गाजलेल्या उरण शेतकरी आंदोलनात त्यांचा प्रमुख सहभाग होता आणि या आंदोलनात त्यांना अटक होऊन दहा दिवस नाशिक जेलमध्ये ठेवले होते. वाचन, चिंतन, मनन, अमोघ वक्तृत्वशैली, सामान्य माणसाविषयीची कणव, डाव्या विचारसरणीचा अंगिकार, इतरांना वेळोवेळी मदत करणे, उक्ती आणि कृतीचा समन्वय साधणे, विविध क्षेत्रात काम करीत असताना आपल्या कर्तबगारीचा वेगळा ठसा उमटविणे, हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. आजही त्याचे प्रत्यंतर येते. पत्रकारितेबरोबरच मीनाक्षी पाटील यांनी आंबेपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच, रायगड जिल्हा परिषदेच्या विरोधी पक्षनेत्या, भू-विकास बँकेच्या संचालिका, रायगड बाजारच्या चेअरमन, पंतकृपा नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन, महाराष्ट्र राज्य हौसिंग फेडरेशनच्या संचालिका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या संचालिका, शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीप्रमुख आदी पदांवर आजवर काम केले आहे. सामान्य माणूस हा केंद्रबिंदू ठेवून त्याच्याच भोवती कामाचा डोंगर उभा करणाऱ्या झुंजार नेत्या म्हणून त्या सर्वपरिचित आहेत. विश्रांती हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नाही. कामाचा ध्यास हा त्यांचा स्थायीभाव आहे. राजकारण आणि समाजकारण या दोन्ही क्षेत्रांसाठी अविरत श्रम घेणाऱ्या मिनाक्षीताईंनी कायमची विश्रांती घेतली आणि आम्ही पोरके झालो. अशा या रणरागिणीला अखेरचा लाल सलाम.






# राहिल्या त्या आठवणी... मीनाक्षीताई!

**सकाळी-सकाळी अलिबाग शेकाप शहर चिटणीस अशोक प्रधानचा फोन आला... मीनाक्षीताई गेल्या. क्षणभर मी स्तब्धच झालो... काय बोलायचं सुचेच ना! एखादी आवडती व्यक्ती गेल्यावर धक्का बसतो, तसं काहीसं झालं. एरवी ताईंबद्दल भरभरून लिहिणारा मी, आत्ता मलाही कसं लिहावं, का लिहावं, किती लिहावं, हेच सुचत नाही. खरोखरच असं वाटतंय की, सारे शब्दच गोठून गेलेत. अर्थात, कारणही तसंच आहे.**

**आनंद कोळगावकर**

गेली पन्नासेक वर्षे मी शेकापची विविध आंदोलने पाहतोय. सर्वच आंदोलनामध्ये ताईंनी हिरीरीने घेतलेला सहभागही पाहिलाय. मीनाक्षीताई पाटील म्हणजे संघर्ष... संघर्ष आणि संघर्ष!! अन्याय सहनच न होणारा स्वभाव, त्यामुळे ताईंना पोलिसांच्या अनेकदा लाठ्याकाठ्यांना, तर कधी कधी तुरूंगवासही भोगावा लागला.

अन्यायाविरूध्द सततचा संघर्ष, दडपशाहीविरूद्ध निडरपणे, बेडरपण अनेकदा केलेला सामना, प्रस्थापितांविरूद्ध, सत्तेविरूद्ध खंबीरपणे पाय रोवून उभे राहण्याचे धाडस यामुळेच ताईंना 'रायगडची रणरागिणी' अशी सार्थ उपाधी जनतेने दिली. लहानपणी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात ॲड. दत्ता पाटलांसोबत, स.का. पाटलांसमोर केलेले आंदोलन असो की नंतरच्या काळातील मंत्र्यांना जिल्हाबंदी असताना अर्बन बँकेसमोर गृहराज्यमंत्री ना. रत्नाप्पा कुंभार यांच्यासमोरचे आंदोलन असो... ताई नेहमीच संघर्षाच्या पावित्र्यात राहिल्या.

मीनाक्षीताईंना अमोघ वक्तृत्वाचे वरदान प्रत्यक्ष सरस्वतीकडूनच मिळाले होते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ज्ञानेश्वरीतील ओव्या, तुकारामगाथा यातील उदाहरणे देत-देत त्यांचे भाषण त्या असे काही फुलवायच्या, की श्रोते अगदी मंत्रमुग्धच व्हायचे. अलिबागेतील कोमसापच्या उद्घाटन समारंभात सूत्रसंचालन करताना त्यांनी केलेलं ना. अंतुलेसाहेबांचं वर्णन आजही मनावर ठसलंय. रायगडावरील शिवराज्याभिषेकाच्या त्रिशतकसमारोहानिमित्त त्यांचे भाषण हेही त्यांच्या अनेक उत्कृष्ट भाषणांपैकी एक होते.

एकदा आरसीएफच्या जनरल मॅनेजरसोबत त्यांना भेटायला गेलो होतो. त्यावेळी त्या राज्यमंत्री होत्या. गप्पांच्या ओघात बाबा आमटेंचा विषय निघाला. आणि लगेचच, ताईंनी बाबांच्या 'ज्वाला व फुले' कवितासंग्रहातील अनेक कविता म्हणून दाखविल्या. खरं तर, आम्हाला धक्काच बसला होता. कारण आम्ही गेलो होतो ते, रणरागिणी नामदार मीनाक्षी पाटलांना भेटायला आणि अनपेक्षितपणे आम्हाला भेटल्या होत्या साहित्यिक आणि कवीमनाच्या मीनाक्षीताई.

राजकीय रणधुमाळी गाजवावी ती मीनाक्षीताईंनीच. सत्ताधारी पक्षावर घनघोर टीका करताना त्यांची भाषा अगदी मर्मभेदी असायचीच; पण कधीही त्यांनी टीका करताना पातळी सोडली नाही. राजकारणात विरोधी असो की स्वपक्षातील, त्या थोरामोठ्यांचा आदरपूर्वकच उल्लेख करीत. बॅ. अंतुले आणि ॲड. दत्ताजीराव खानविलकरांसोबत राजकीय आणि वैचारिक मतभेद जरी असले, तरी त्यांची विद्वत्ता आणि ज्येष्ठता याबद्दल ताईंना नेहमीच आदर वाटला.

जिल्ह्यातील एका मात्तबर राजकीय घराण्याचा वारसा त्यांना लाभला. पत्रकार संघ, रायगड बाजार चेअरमन, जिल्हा परिषद सदस्य, आमदार आणि राज्यमंत्री असा प्रदीर्घ आणि चतुरस्त्र अनुभव संपन्न असूनदेखील ताई नेहमीच निगर्वी आणि डाऊन-टू-अर्थ राहिल्या. मला आठवतं, त्यांच्या एका आमदारकीच्या निवडणुकीत त्यांच घोषवाक्यच होतं... 'उतणार नाही, मातणार नाही... घेतला वसा टाकणार नाही.' थोरामोठ्यांपासून ते अगदी सामान्यांना ताईच्या लेखी सारखीच ट्रीटमेंट मिळे.

जिल्ह्यातील महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रसंगी ताई सर्वस्व पणाला लावीत. त्यांनीच मला सांगितलेला एक प्रसंग. श्रीवर्धन तालुक्यातील लिपणिवावे या गावातील दारू दुकानामुळे गावातील तरूणाई व्यसनाधीन होऊ लागली होती. गावातील महिलांनी शासन दरबारी अनेक वेळा अर्ज विनंत्या केल्या. परंतु, काही बड्या मंडळींचा आतून पाठिंबा असल्याने दारूचे दुकान काही बंद होईना. शेवटी सर्व महिला ताईंना भेटल्या. त्यांनीदेखील सामोपचाराने सर्व मार्ग अवलंबिले. परंतु, तरीही दुकान काही बंद होईना! मग शेवटी विधिमंडळात ताईंनी रुद्रावतार धारण केला. ताईंचा तो आविर्भाव पाहून संबंधित मंत्रीमहोदयांची गाळण उडाली आणि तात्काळ लिपणिवावेमधील 'ते' दारू दुकान बंद झाले. असा होता आमच्या ताईंचा दरारा नि दबदबा!

वर्षामागून वर्षे गेली, काळ बदलला, राजकारणाचा पोतही बदलला. राजकारणावर अर्थकारण भारी ठरू लागले. प्रकृती अस्वास्थ्यामुळे मीनाक्षीताईंनीही हळूहळू ॲक्टीव राजकारणातून लक्ष कमी केले. परंतु, तरीही रायगडमधील जनता 'मीनाक्षीताई' म्हटलं की आजही गर्दी करतच होती. कणखर, खंबीर मीनाक्षीताईंच्या अमोघ, ओघवत्या भाषेने हजारो कार्यकर्त्यांना स्फूरण चढत होते. भाषणाला उभ्या राहिल्यावर त्यांचा तो काळजाला भिडणारा आवाज आठवला की आजही अंगावर शहारा येतो.

अलिबागच्या आदर्श पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी समारंभातील त्यांचे भाषण, मी ऐकलेले शेवटचे सार्वजनिक भाषण. प्रकृतीमुळे ताई बहुदा बोलणार नाहीत असं वाटलं होतं. परंतु, ताईंनीच स्वत:हून आग्रहाने, मी बोलणार असं सांगितलं आणि प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांच स्वागत केलं. मी फक्त दोन मिनिटे बोलेन अशी सुरुवात करणाऱ्या ताई तब्बल दहा-पंधरा मिनिटे बोलल्या, तेही अस्खलीत, फर्ड्या आवाजात आणि नेहमीच्याच तडफेने.

आज तो आवाज लुप्त झाला. शेतकरी कामगार पक्षाचे हजारो कार्यकर्ते आज हळहळत आहेत. महिलांच्या प्रश्नावर खमकेपणाने टक्कर देणारे नेतृत्व आज पडद्याआड गेलंय. खरं तर, आजकाल ताई राजकीयदृष्ट्या एवढ्या सक्रीय नव्हत्या, तरी ताईंच 'असणं' हेच मुळी सर्वांना आश्वासक वाटत असे.

खरं तर, ताई आज आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसणं कठीणच आहे. शेकाप कुटुंबाला हे दु:ख पचवणं कठीणच आहे. परंतु तरीही, मीनाक्षी पाटलांनी आयुष्यभर जो गोरगरीबांच्या कल्याणाचा, डाव्या विचारसरणीचा वसा घेतला, तो वसा तसाच चालू ठेवून, त्याला नवा आयाम प्राप्त करून देणं हीच खरी ताईंना श्रद्धांजली ठरेल.

ताई, पेझारीला बंगल्यावरून जाताना आपली खूप आठवण येईल... खरंच!

# पत्रकार, आमदार ते राज्यमंत्री

**शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीच्या लढाऊ नेत्या, झुंजार पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या म्हणून मीनाक्षी पाटील सर्व महाराष्ट्राला सुपरिचित होत्या. कै. ना.ना. पाटील यांची नात, भाई प्रभाकर पाटील यांची कन्या, आमदार दत्ता पाटील यांची पुतणी असा वारसा लाभलेल्या या रायगड कन्येला सामाजिक, राजकीय सांस्कृतिक जीवनाचे बाळकडू अगदी लहान वयापासून मिळाले होते. याशिवायही एक स्वतंत्र, तडफदार व अभ्यासू असे व्यक्तिमत्त्व म्हणून आपले वेगळे स्थान त्यांनी निर्माण केले होते. शेतकरी कामगार पक्षाची शेतकरी, कामगार, सामान्य माणूस व महिलांसाठी लढे देण्याची जाज्वल परंपरा, राजकारणात सक्रीय कार्य करीत, मीनाक्षी पाटील जागवीत आल्या होत्या. मीनाक्षीताई यांच्या अभ्यासू वृत्तीमुळे सर्व थरातील जनतेशी संवाद त्यांचे प्रश्न समजून घेऊन ते प्रश्न योग्यरित्या विधिमंडळात मांडून त्यांना ते सोडविण्यात यश आल्याचे सर्वश्रुत आहे.**

रायगड जिल्हा परिषदेच्या विरोधी पक्षनेत्या म्हणून त्या सतत सभागृह गाजवीत होत्या. सीमा प्रश्नावरुन झालेल्या महाराष्ट्रातील चळवळीत पोलिसांचे कडे तोडून मीनाक्षी पाटील यांनी जी धडक मारली ती सरळ कौन्सिल हॉलच्या व्हरांड्यातच! जगन्नाथ मिश्र यांनी आणलेल्या बिहार प्रेस विधेयकाच्या निषेधार्थ महाराष्ट्रातील पत्रकारांनी केलेल्या आंदोलनात हरसूल येथील तुरुंगात जाणाऱ्या देशातील त्या एकमेव स्त्री पत्रकार! उरणच्या क्रांतिकारी लढ्याने त्यांना घडविला येरवड्याचा तुरुंग! भाववाढ रोखण्यासाठी पक्षाने केलेल्या चळवळीत त्यांनी पार पाडलेली महत्त्वाची भूमिका ती महिला आघाडीच्या नेत्या म्हणून! पत्रकारितेचा 'दर्पण' पुरस्कार मिळविणाऱ्या त्या पहिल्या महिला पत्रकार! पत्रकार संघाच्या राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक संस्थांवर त्यांनी महत्त्वाचा पदभार सांभाळला. नव्हे, शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी राजकारण आणि समाजकारणाचा वसा सांभाळला होता. महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक सभा आणि शिबिरात त्यांनी सक्रीय भाग घेतला व अन्यायाचे निराकरण केले. इतकेच नव्हे तर, एक अभ्यासू, लेखिका म्हणूनही त्या महाराष्ट्राला परिचित होत्या. त्यांनी लिहिलेले अनेक अभ्यासपूर्ण लेख आजही वाचकांच्या संग्रही आहेत! अलिबाग येथे 'रामनारायण पत्रकार भवन' उभे राहिले ते केवळ त्यांच्या अथक परिश्रमामुळेच! विविध महिला समित्या व पत्रकार संघटनांच्या अनेक शासकीय व बिगर शासकीय समित्यांवर त्यांचा सक्रीय सहभाग होता.



शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्यही फार प्रशंसनीय आणि महत्त्वाचे होते. पोयनाड येथील पिरोजबाई बारिया प्राथमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच महिला वरिष्ठ महाविद्यालय यांच्या स्थापनेत व विकासात त्यांचा सिंहाचा वाटा होता. एवढेच नव्हे तर, विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या अडचणी सोडविण्याकडे त्यांचे सतत लक्ष असे. गरीब, होतकरु व अभ्यासू विद्यार्थ्यांना विविध संस्थांमार्फत मदत करण्याच्या व साहित्य वाटप करण्याच्या कामी त्या अग्रेसर असत. महाराष्ट्र राज्यात त्या जिल्हा परिषदेतील अभ्यासू विरोधी नेत्या, वक्त्या व जाणकार म्हणून ओळखल्या जात. जि.प.च्या नियमांची काटेकोर जाण, नेमकी व समर्पक भाषा, प्रश्नांचा सांगोपांग विचार व तपशीलातील मोजकेपणा व त्याचबरोबर व्यवहारातील दक्षता यामुळे त्यांचे जि.प.तील कार्य नजरेत भरण्यासारखे, प्रशंसनीय व उल्लेखनीय होते. त्यांचे कार्य समग्र महाराष्ट्रात आदर्शवत ठरले आहे. विधानसभेत मीनाक्षी पाटील एकूण तीन वेळा निवडून गेल्या. विधानसभेतील त्यांची कामगिरी उल्लेखनीय व अभिमानास्पद अशी राहिली.

१९९५ ला विधानसभेत त्या पहिल्यांदा निवडून गेल्या. त्यानंतर २००० साली दुसऱ्यांदा. याच काळात त्यांनी बंदरे व मत्स्य विभागाचे राज्यमंत्रीपद भूषविले. खात्याला त्यांनी जाण आणली. कोकणाच्या संपूर्ण सागर किनारी बंदर विकासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे निर्णय घेतले. मत्स्य विभागात कोळी बांधवांच्या हिताचे अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. त्यात मासे उतरविण्याचे लॅन्डींग सेंटर, परदेशी मत्स्य व्यावसायिकांची हकालपट्टी, स्थानिकांना अभय, मच्छिमार जेटीवर मूलभूत सुविधा, डिझेलवरील सेल टॅक्स माफ, सुशिक्षित बेरोजगारांसाठी खाडीलगतची जागा मत्स्य व्यवसायासाठी देण्याचा क्रांतिकारक निर्णय घेतला. ज्यामुळे अनेकांना रोजगार मिळाला. गावोगावी मत्स्य तलाव निर्माण केले. महाराष्ट्रातील पहिला ग्रोएन बंदर, तसेच कोकणाप्रमाणे विदर्भातील मच्छिमार बांधवांचे मत्स्य तलाव त्यांना परत मिळवून देऊन त्यांनी पिढीजात मत्स्य व्यवसायाला कोकणाचा ७२० कि.मी. लांबीच्या सागरकिनारी नीलक्रांती घडवून आणली! विधिमंडळातील एक अभ्यासू आमदार म्हणून मीनाक्षी पाटलांनी अलिबागचे नाव नेहमीच उज्ज्वल केले. आज मीनाक्षी पाटलांमुळेच अलिबाग तालुका टँकरमुक्त आहे. जवळजवळ ९९ टक्के विद्युतीकरण आहे. मूलभूत सुविधा देण्यामध्ये आणि अलिबागच्या सर्वांगीण विकास करण्यात मीनाक्षी पाटील नेहमीच यशस्वी झाल्या.

'उतणार नाही, मातणार नाही, घेतल्या वसा टाकणार नाही.'

अस विधानसभेत प्रवेश करताना जनतेला दिलेले अभिवचन त्यांनी निश्चयपूर्वक पार पाडले. विनय, सशीलता अहंकारमुक्त अशा ताईंनी नेहमीच जनतेच्या हृदयावर राज्य केले. अशा या ताईंचा आम्हा साऱ्यांनाच अभिमान आहे. जगातील श्रमिकांनो एक व्हा. गमविण्यासाठी गुलामगिरीच्या बेड्या आहेत. परंतु, जिंकण्यासाठी उभ्या जगाचे राज्य आहे. असे ताई नेहमी करत असलेले आवाहन आम्हाला आज स्फूर्ती, नवी ऊर्मी देऊन जाते.

ताईंना अखेरचा लाल सलाम !



# बलवडीकरांशी ऋणानुबंध

**रायगड जिल्ह्याच्या शेतकरी कामगार पक्षांच्या झुंजार नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार पक्षाच्या मार्गदर्शिका हरपल्या. मीनाक्षीताईंचा सांगली जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील बलवडीकरांशी ४० वर्षांपासून असलेला ऋणानुबंध संपुष्टात आला. मीनाक्षीताई अन् बलवडीतील कार्यकर्त्यांशी असलेले अनोखे नाते काळाच्या पडद्याआड गेल्याने सामान्य कार्यकर्त्यांतून हळहळ व्यक्त होत आहे.**

**दीपक पवार**

खानापूर तालुक्यातील बलवडी हे येरळा नदीकाठावर वसलेले गाव. भाई गोविंदराव पवार हे शेतकरी कामगार पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक. गावातील बी.डी. कुंभार हे पन्नास वर्षांपूर्वी अलिबाग येथे कोकण एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून रुजू झाले अन् दत्ता पाटील, नारायण नागू पाटील यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. मीनाक्षीताई, भाई जयंत पाटील, पंडितशेठ हे बी.डी. सरांचे विद्यार्थी. शाळेत असताना त्यांना गणिताचे धडे दिले. तेव्हापासून बी.डी. सरांशी गुरू-शिष्याचे नाते अखंडपणे जपले. बी.डी. कुंभार यांच्या कन्या सविता यांच्या विवाह सोहळ्यास राज्याचे राज्यमंत्री असतानाही त्या आल्या. ग्रामस्थांशी संवाद साधला. त्या राज्यमंत्री असताना बलवडी ग्रामपंचायतीच्या इमारतीसाठी राज्य शासनाच्या वैज्ञानिक विकास महामंडळातर्फे निधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. मीनाक्षीताईंच्या सहकार्याने इमारत उभी राहिली. अशा अनेक कामांमध्ये त्यांनी सढळ हाताने मदत केली. १९८६ साली येरळा नदीपात्रात लोकसहभागातून बळिराजा स्मृती धरणाची निर्मिती होत होती. त्या कामांमध्ये त्यांनी काम केले.

## पतंगराव कदम यांच्याशी अनोखं नातं

**रायगड जिल्ह्यातील शेकापचे पाटील कुटुंबिय अन् पतंगराव कदम यांचे अनोखं नाते होते. याची प्रचिती वेळोवेळी आली आहे. वर्ष होतं १९९९. राज्यात भाजप-शिवसेना यांचे सरकार जाऊन काँग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेवर आलेले. सांगली जिल्ह्यातून काँग्रेसतर्फे पतंगराव कदम यांची राज्याच्या मंत्रिमंडळात वर्णी लागलेली. त्याचवेळी शेकापच्या कोट्यातून मीनाक्षीताईंची राज्यमंत्री म्हणून वर्णी लागलेली. तेव्हापासून पतंगराव कदम यांच्याशी मैत्रीचे संबंध होते. आठ वर्षांपासून पतंगरावांचे अकाली निधन झाले, तेव्हा मीनाक्षीताई तब्येत ठीक नसतानाही पतंगराव कदम यांच्या जन्मगावी सोनसळ आल्या होत्या. बंधू मोहनराव कदम, विश्वजीत कदम यांना धीर दिला होता. कदम-पाटील यांच्यातील कौटुंबिक जिव्हाळा जपणाऱ्या मीनाक्षी पाटील यांचे निधन अस्वस्थ करणारे आहे.**

# ...अन् सी लिंक उभा राहिला

**कर्जत तालुक्यातील थोरवे घराणे हे शेतकरी कामगार पक्षाशी बांधील असलेले घराणे समजले जाते. त्या घराची चौथी पिढीदेखील शेतकरी कामगार पक्षाशी बांधील असून, १९८५ मध्ये शेकापचे अधिकृत उमेदवार सुमंत राऊत यांच्यासमोर पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णू ठाणगे यांनी बंडखोरी केली होती. त्यावेळी प्रभाकर पाटील आणि मीनाक्षी पाटील यांनी मला शिक्षण पुरे झाले, आता पक्षाचे काम करावे लागेल, अशा सूचना दिल्या होत्या. त्या आधी माझे वडील, आजोबा यांनी ग्रामपंचायतीमध्ये शेतकरी कामगार पक्षाचे नेतृत्व केले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत तरुणवर्गाला शेकापचे विचार पटवून देण्यासाठी माझ्यासारखा कार्यकर्ता पक्षाच्या मुख्य प्रवाहात आला.**

**विलास थोरवे**

मीनाक्षीताई यांच्या भाषणासाठी आम्ही जिल्ह्यात कुठेही जात होतो. माझ्यामध्ये भाषण करण्याची जी कला विकसित झाली. ती मीनाक्षीताई यांच्यामुळेच कारण, मीनाक्षीताई यांच्या भाषणात अभ्यासपूर्ण विवेचन असायचे. आपले मुद्दे जनमानसात पटवून देण्याची त्यांची हातोटी असायची आणि जुने मुद्दे, संदर्भ, कविता, अभंग आणि सुविचार यांचा मिलाप असायचा. त्यांची भाषणे ऐकूनच मी बोलायला लागलो, असे नमूद करायला हवे.

१९९५ मध्ये रायगड जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षातील नवीन चेहेऱ्यांना संधी देण्यात आली होती. त्यावेळी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला विधानसभेची उमेदवारी खालापूर विधानसभा मतदारसंघात देण्यात आली. राज्य सरकारमध्ये मीनाक्षीताई पाटील यांना मंत्रिपदाची संधी मिळाली आणि खारभूमी आणि मत्स्य विकास राज्य मंत्री असताना सरकारने मुंबई येथील सी लिंकचे काम हाती घेतले होते. त्या पुलाच्या कामाला कोळी लोकांनी विरोध करीत प्रचंड आंदोलन उभे केले होते. आंदोलनकर्ते कोणत्याही नेत्याला ऐकत नव्हते आणि सरकारची भूमिका समजून घेत नव्हते. अशावेळी त्या खात्याच्या राज्यमंत्री मीनाक्षीताई यांनी कोणताही पोलीस बंदोबस्त न घेता वरळी येथे कोळी समाजाच्या आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. त्या ठिकाणी काही तास चर्चा करून मीनाक्षीताई पाटील यांनी मूळवासी कोळी लोकांचे मतपरिवर्तन केले आणि सी लिंक पूल उभा राहिला. ते कार्य माझ्यासारख्या कार्यकर्त्याला अत्यंत प्रेरणादायी वाटावे असेच ठरले.

## पंचतारांकित हॉटेलऐवजी घरी जेवण

**पाटील कुटुंब प्रचंड खवय्ये आहेत, याची सर्वांना माहिती आहे. मात्र, ग्रामीण भागात गावभेटी किंवा पक्षाच्या कार्यक्रमाला गेले असता पाटील कुटुंबीय आजही कार्यकर्त्यांच्या घरी जेवण करतात याचं कायमच अप्रूप वाटतं. पंचतारांकित हॉटेलमध्ये जाऊन जेवण्याची परिस्थिती असूनदेखील केवळ कार्यकर्त्यांच्या घरातील चटणी-भाकरी काहीही खाण्याची त्यांची तयारी असते. ताई माझ्या घरी स्वयंपाकघरात जेवण बनवून घेत आणि मनसोक्त खात. कर्जतमध्ये आल्यावर माझ्या घरी त्यांची पावले नेहमी वळायची. मात्र त्यांच्या जाण्याने त्यांची पावले माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याच्या घरी लागणार नाही, याचे दु:ख कायम राहील.**



# माथेरानशी नाते...

**शेतकरी कामगार पक्षाच्या माजी आमदार मीनाक्षीताई पाटील यांचे जाण्याने माथेरानमधील त्यांचे ऋणानुबंध उजळून आले आहेत. माथेरानमधील शेतकरी कामगार पक्षाचे धडाडीचे व निष्ठावंत कार्यकर्ते माजी आमदार सुमंतराव राऊत, कै. अर्जुन बिरामने, कै. परशुराम पाटील, कै. दत्तात्रेय बा. पवार यांनी माथेरानचे प्रश्न मीनाक्षीताई यांच्याकडे अनेकदा मांडले.**

**जनार्दन पार्टे**

माथेरानमधील नागरिकांनी आपल्या गरजेपोटी बांधलेल्या घरांना माथेरान गिरीस्थान नगरपरिषद त्यावेळी भाडे आकारत नव्हती. तेव्हा मीनाक्षीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली माथेरान येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला होता. त्या प्रश्नी मीनाक्षी पाटील यांनी माथेरान येथील अनधिकृत झोपडीवजा घरांना पालिकेचे भाडे आकारण्यात यावे यासाठी आंदोलन उभे केले होते. त्यानंतर त्या आंदोलनाची दखल घेत माथेरान शहरातील अनधिकृत घरांना नगरपरिषदेने भाडे आकारणे सुरू केले होते. त्या आंदोलनानंतर अनधिकृत घरांना विजेची जोडणी आणि पाण्याचे कनेक्शन मिळू लागले. मीनाक्षीताई यांच्या आंदोलनातून माथेरान येथील गरजू लोकांना हक्काचे घर मिळाले आहे. माथेरानच्या डोंगरात असलेल्या हशाची पट्टी येथील आदिवासी वाडीमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी शाळा नव्हती. स्थानिकांच्या मागणीनुसार मीनाक्षीताई पाटील आणि प्रभाकर पाटील यांनी हा प्रश्न विश्वहिंदू परिषदेच्या मागणीनुसार पूर्ण केला. हशाची पट्टी येथे रायगड जिल्हा परिषदेमार्फत शाळा बांधून दिली आणि शिक्षकांचीदेखील नियुक्ती केली. त्यामुळे आज हशाची पट्टी येथील आदिवासी बांधवांच्या जीवनात क्रांती घडवून आली.




# झुंजार पर्वाचा अस्त.. संपूर्ण रायगड शोकसागरात!



**माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने संपूर्ण रायगड जिल्हा शोकसागरात बुडाला. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री उदय सावंत, माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, माजी खा. सुप्रिया सुळे, मंत्री छगन भुजबळ, आ. रोहित पवार, माजी खा. सुनील तटकरे, अनिकेत देशमुख, आ. महेंद्र दळवी, आ. भरत गोगावले, माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. धैर्यशील पाटील, सुरेंद्र म्हात्रे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत तसेच राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी मीनाक्षीताईंच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. सोशल मीडियावरील शोकसंदेशांद्वारे तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहात मान्यवरांनी मीनाक्षीताईंच्या सोबत केलेल्या कार्याला, आठवणींना उजाळा दिला. मीनाक्षीताई सदैव स्मरणात राहतील, अशी प्रतिक्रिया सर्वांनी व्यक्त केली.**



शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे निधनाची बातमी अत्यंत दुःखदायक आहे. एक अभ्यासू नेत्या अशी ख्याती असणाऱ्या मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्राचे नुकसान झाले आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती प्रदान करो, तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना या दुःखातून सावरण्याकरिता बळ देवो, हीच प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली.

– मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



रायगडच्या रणरागिणी, शेकाप नेत्या, माजी मंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. पत्रकारिता हा त्यांचा मूळ बाणा. वाचनाचा व्यासंग, चिंतन, अमोघ वक्तृत्व शैली यामुळे प्रत्येक प्रश्नांची त्यांना सखोल जाण होती. सरपंच ते जिल्हा परिषद, भूविकास बँक, नागरी पतसंस्था, हाऊसिंग फेडरेशन ते राज्यात मंत्री अशा कितीतरी क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा अमीट ठसा उमटवला. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवत त्यांनी आपल्या कार्याचा डोंगर उभा केला. काही ना काही निमित्ताने सातत्याने त्यांच्याशी बोलणे होत असायचे. त्यांच्या जाण्याने सामान्य माणसाचा आधारवड हरपला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. ॐ शांती.

– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



माजी मीनाक्षी पाटील यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखदायक आहे. रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या एक झुंजार नेत्या अशी त्यांची ख्याती होती. प्रत्येक जनआंदोलनात त्या अग्रस्थानी असायच्या. मीनाक्षीताईंच्या निधनाने राजकीय क्षेत्रातील एक अभ्यासू, कार्यकुशल व लोकाभिमुख नेतृत्व हरपले आहे. पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहवेदना व्यक्त करतो. भावपूर्ण श्रद्धांजली.

– खा. शरद पवार, अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)



माझ्या राजकीय जडणघडणीत ज्यांनी ज्यांनी मला मार्गदर्शन केले, त्यामधील मीनाक्षीताई आहेत. प्रशासनाचा गाढा अभ्यास असल्याने त्यांचं मार्गदर्शन मला जेव्हा जेव्हा लाभलं, तेव्हा तेव्हा मला त्याचा फायदाच झाला. अक्षरशः माझ्यावर त्यांनी मुलाप्रमाणे प्रेम केलं. प्रत्येक गोष्टी त्यांनी मला आईप्रमाणे समजावून सांगितल्या. विधिमंडळातील बऱ्याचशा वैधानिक बाबी मला त्यांच्याकडून शिकता आल्या आणि त्याचा पुढे मला माझ्या आमदारकीच्या कारकीर्दीत उपयोग झाला. आज त्यांच्या निधनाने मला एकच भावना प्रकट करायची आहे; ती म्हणजे, आईव्रत प्रेम करणारा माझा नेता हरपला आहे.

– माजी आ. धैर्यशील पाटील



माजी मंत्री मीनाक्षीताई पाटील म्हणजे आगरी समाजाचा मानबिंदूच. आगरी समाजात ज्या बोटावर मोजणाऱ्या महिला स्वकर्तृत्वाने पुढे गेल्या, त्यामधील मीनाक्षीताई आहेत. तीन वेळा आमदार म्हणून आणि मंत्री म्हणून एक यशस्वी वाटचाल त्यांनी केली. त्यांनी विधिमंडळात आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला होता. अभ्यासू व्यक्तिमत्त्व काय असते, हे मीनाक्षीताईंकडे पाहिल्यावर आम्हाला समजायचे. आज त्यांच्या निधनाने आगरी समाजाचं एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेल्याचे दुःख होत आहे.

– आ. रविशेठ पाटील, पेण



शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनानं महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारणातला एक संघर्षशील अध्याय संपला आहे. जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरुन लढणारं, विधिमंडळात जोरदार आवाज उठवणारं निर्भीड नेतृत्वं काळाच्या पडद्याआड गेलं आहे. मीनाक्षीताई पाटील यांचं संपूर्ण कुटुंबच शेतकरी कामगार पक्षाशी जोडलं गेलं आहे. लहानपणापासूनच त्यांच्यावर शेतकरी कामगार पक्षाच्या विचारांचे संस्कार झाले. त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरुन मोर्चे, आंदोलनं केली. त्यांचं जीवन दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांच्या कल्याणासाठी समर्पित होतं. परखड वक्तव्य व प्रशासनावर असलेली पकड यामुळे त्यांचा संपूर्ण रायगड जिल्ह्यात दरारा होता. पाटील कुटुंबियांच्या तसंच त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात मी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सहभागी आहे.

– उपमुख्यमंत्री अजित पवार



राजकारणातील लेकी आज पोरक्या झाल्या आहेत. मी, जिल्हा परिषदेची अध्यक्ष झाली, त्यावेळी माझ्यासाठी राजकारण आणि संसार या दोन्ही बाबी सांभाळणे शक्य नव्हते. परंतु, मीनाक्षीताईंनी संसार करता-करता राजकारण कसे सांभाळायचे, सर्वसामान्य जनतेला न्याय कसा द्यायचा, सर्वसामान्यांच्या समस्या कशा सोडवायच्या, या गोष्टी अगदी मला बोलावून त्यांनी समजावून सांगितल्या. पुढे कधीच मला संसार आणि राजकारण तारेवारची कसरत वाटली नाही. याचे सर्वस्वी श्रेय मी मीनाक्षीताईंना देईन. आज त्यांच्या जाण्याने माझ्यासारख्या राजकारणातील अनेक लेकी पोरक्या झाल्या.

– ॲड. निलीमा पाटील



विविध आंदोलनांमध्ये खंबीरपणे सहभागी होणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या एक झुंजार नेत्या अशी त्यांची ओळख होती. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे, ओघवती वक्तृत्व शैली यांमुळे उत्तम वक्त्या म्हणून त्या प्रसिद्ध होत्या. त्यांच्या निधनाने एक अभ्यासू महिला नेत्या काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. पाटील कुटुंबियांच्या दुःखात मी व माझा परिवार सहभागी आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो व मृतात्म्यास सद्गती लाभो, हीच प्रार्थना!

– मंत्री छगन भुजबळ



मीनाक्षीताई पाटील एक अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून सुपरिचित होत्या. जनहिताच्या मुद्द्यावर त्या सत्ताधाऱ्यांना अक्षरशः धारेवर धरत असत. शेतकरी, कामगार, कष्टकरी समूहाच्या वेदनांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. त्यांनी महिलांच्या उत्थानासाठी केलेले कार्य अतिशय मोलाचे आहे. याखेरीज त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही अतिशय मोठे काम केले आहे. त्यांच्या निधनामुळे शेकापचे नेते व मीनाक्षीताई पाटील यांचे पुत्र आस्वाद पाटील, बंधू जयंतजी पाटील आणि पंडितजी पाटील यांच्यावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत.

– माजी खा. सुप्रिया सुळे



शेतकरी कामगार पक्षाच्या लढवय्या नेत्या मीनाक्षी पाटील यांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एक खंबीर नेतृत्व व अभ्यासू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या नेत्या म्हणून आम्हा महिलांसाठी त्या कायमच आदर्शवत राहिल्या आहेत. प्रेमळ स्वभावाबरोबरच स्पष्ट वक्त्या म्हणून त्यांची एक वेगळी ख्याती होती. अनेक विकासकामे करीत असताना त्यांनी कायमच कौतुकाची थाप दिली. वेळप्रसंगी खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. त्यांची आठवण कायमच स्मरणात राहणार असून, त्यांचा आदर्श घेत समाजाच्या हितासाठी काम करण्याचा प्रयत्न नक्की करेन.

– चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख, शेकाप



मी गेली चाळीस वर्षे ताईंबरोबर पक्षाचे निष्ठेने काम केले. ताईंच्या जाण्यामुळे पक्षाची मोठी हानी झाली आहे. आमच्या राजपुरी कोळी समाजाच्या वतीने व मुरुड तालुका शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.

– विजय कृष्णा गिदी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबई



आपल्या कर्तृत्वाने, दातृत्वाने आणि ममत्वाने ज्यांनी संपूर्ण रायगड जिल्ह्यात ठसा उमटवला अशा माजी मंत्री मीनाक्षीताई पाटील यांना देवाज्ञा झाल्याचे वृत्त समजले. मीनाक्षी ताई यांच्या संपूर्ण कुटुंबासोबत एक जिव्हाळ्याचे नाते आहे. मी त्यांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मीनाक्षीताई यांच्या आत्म्यास शांती देवो.

– मंत्री रवींद्र चव्हाण




शेतकरी कामगार पार्टी की वरिष्ठ नेता, पूर्व मंत्री, मेरी बहन मीनाक्षी पाटिल जी के निधन का समाचार अत्यंत दुखद है। महाराष्ट्र विधानसभा के मेरे पहले कार्यकाल के दौरान प्रांतवाद और भाषावाद के खिलाफ मेरी लड़ाई में मिनाक्षी ताईने हमेशा मेरा साथ दिया। इस दुखद अवसर पर हमारी संवेदनाएं उनके परिवार और रिश्तेदारों के साथ हैं।

– आ. अबू आझमी



शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांच्या निधनाचे वृत्त दुःखद असून, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांना सद्गती प्रदान करो! ॐ शांती शांती!

– आ. प्रशांत ठाकूर



जिल्ह्यातील शेकाप पक्षाच्या अभ्यासू लढवय्या महिला नेत्या म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने राजकारणात पोकळी निर्माण झाली असून, राजकीय महिलांच्या मार्गदर्शक हरपल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

– स्नेहल माणिकराव जगताप-कामत, माजी नगराध्यक्ष, शिवसेना नेत्या



मीनाक्षीताई या अलिबाग नव्हे तर, संपूर्ण राज्याच्या ताई होत्या. राज्याच्या मंत्री म्हणून कार्यरत असताना शेवटच्या घटकाच्या व्यथा सोडविण्याचे काम ताईंनी सक्षमपणे केले आहे. सुरुवातीच्या काळखंडात ताईंचे जीवन संघर्षातून झाले. सामाजिक, राजकीय आयुष्यात त्यांनी उदंड यश मिळविले आणि अनुभवले आहे. ताईंचे भक्कम पाठबळ पाटील कुटुंबियांना कायम राहिले आहे. अतिशय अभ्यासू, मनापासून काम करणाऱ्या नेत्या म्हणून ताईंची ओळख होती. त्यांच्या अंत्ययात्रेला उपस्थित असलेला हा जनसुमदाय त्यांनी केलेल्या कार्याची पोचपावती आहे.

– माजी आ. बाळाराम पाटील




शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या आणि माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाचे वृत्त फारच दुःखद आहे. या कठीणप्रसंगी माझ्या सहवेदना त्यांच्या कुटुंबियांसमवेत आहे. मीनाक्षीताईंना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ओम शांती.

– आ. प्रवीण दरेकर



शेकाप नेते जयंत पाटील आणि माजी आमदार सुभाष पाटील यांच्या ज्येष्ठ भगिनी, मा. राज्यमंत्री व शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षी पाटील यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

– अनंत गीते, माजी केंद्रीय मंत्री



रायगड जिल्ह्याच्या झुंजार नेत्या मीनाक्षीताईंच्या निधनाने या जिल्ह्यावर, शेतकरी कामगार पक्षावर आणि पाटील कुटुंबियावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या जाण्याने शेतकरी कामगार पक्षामध्ये न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. पाटील कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो.

– अनिकेत देशमुख, सांगोला शेकाप नेते



कुशल वक्त्या आणि प्रभावी नेत्या अशी मीनाक्षीताईंची ओळख होती. शेतकरी, कष्टकरी यांच्या हितासाठी लढताना त्यांनी विविध आंदोलनांमध्ये सहभाग घेतला. त्यांच्या निधनाने राज्यातील एक कणखर महिला नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. पाटील कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो आणि मृतात्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

– मंत्री दिलीप वळसे पाटील



रायगडच्या नव्हे तर, संपूर्ण महाराष्ट्राच्या झुंजार नेत्या आज आपल्यातून निघून गेल्या. स्वतःच्या दुःखापेक्षा समाजाचे दुःख मोठे आहे, हे ताईंनी ओळखून आपले सारे जीवन तमाम शेतकरी, कामगारांसाठी समर्पित केले. कौटुंबिक, ऋणानुबंधाचे नाते कसे जपावे हा आदर्श ताईंच्या माध्यमातून प्रत्येकाने घ्यावा.

– माजी खा. सुनील तटकरे



मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाने एक अभ्यासू व संघर्षशील नेत्या काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. मंत्री आणि आमदार म्हणून गरीब, शेतकरी, कष्टकरी, पीडित, वंचित यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली!

– काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात




माजी राज्यमंत्री, अलिबाग विधानसभेचे तीनवेळा प्रतिनिधित्व केलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. त्यांच्या निधनाने राजकीय व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. भावपूर्ण श्रद्धांजली.

– मंत्री धनंजय मुंडे



मीनाक्षी पाटील या सर्वांच्या ताई म्हणून प्रसिद्ध होत्या. हसतमुख चेहरा, स्पष्टवक्त्या व अभ्यासू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या त्या लढवय्या नेत्या होत्या. विरोधकांनादेखील आपलेसे करण्याची ताकद त्यांच्यामध्ये होती. तळागाळातील घटकाशी बांधीलकी त्यांनी कायमच जपली आहे.

– आ. भरत गोगावले (शिंदे गट)



रायगड जिल्ह्याच्या पुरुषप्रधान राजकारणात महिला राजकारणी होऊन राज्याच्या मंत्रिमंडळात रणरागिणी असा ठसा उमटविणाऱ्या आणि महिलांचा नेहमीच आधारवड राहिलेल्या ताई आमच्या आदर्श होत्या. समाजकारण आणि राजकारण यांची मीनाक्षीताईंनी घातलेली सांगड नव्या पिढीला कायम मार्गदर्शक ठरणारी आहे. कोणत्याही विषयावर कोणत्याही क्षणी मार्मिक बोलणे आणि सरकारच्या धोरणांवर अभ्यासपूर्ण भाषण करून जेरीस आणण्याचा त्यांचा बाणेदारपणा, त्यांची लेखणी आणि वक्तृत्व असाधारण होते. आदरणीय माजी विरोधी पक्षनेते ॲड. दत्ता पाटील, कोकणाचे भाग्यविधाते प्रभाकर पाटील यांच्या राजकीय आणि सामाजिक तालमीत कसून तयार झालेले हे नेतृत्व बहरले आणि राज्याच्या विकासात आपले योगदान दिले. त्यांची राजकीय कारकीर्द माझ्यासाख्या महिलेला राजकारणात अस्तित्व निर्माण करून देण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन करणारी ठरलेली. राजकीय क्षेत्रात काम करताना अनेकदा त्यांच्या सान्निध्यात जाऊन हितगुज करण्याची संधी मिळाली. चूल आणि मूल सांभाळणाऱ्या महिलेले फिनिक्स पक्ष्याप्रमाणे आकाशात उत्तुंग झेप घ्यायला हवी, असे त्यांचे विचार नेहमीच राजकीय क्षेत्रात आपले भविष्य घडवू पाहणाऱ्या महिलांना प्रेरणा देणारे ठरतील. एकीकडे लोकसभेची आचारसंहिता सुरु असताना दुसरीकडे रायगडचं नव्हे तर, राज्याच्या राजकारणातील राजकीय आणि सामाजिक विचारांचे मीनाक्षीरूपी वादळ शमल्याने भावी पिढीची निश्चित हानी झाली आहे. मीनाक्षीताईंना तमाम रायगडवासियांकडून आणि कारेकर कुटुंबियांकडून विनम्र आदरांजली.

– अपेक्षा कारेकर, माजी अध्यक्षा, रायगड जिल्हा परिषद





मीनाक्षीताई मला बहिणीसमान होत्या. मी १२ वर्षे रायगड जिल्हा परिषदेचा सभापती होतो. मला सभापती करण्यामध्ये ताईंचा सिंहाचा वाटा होता. ताईंना अनेक वेळा विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने मी माणगावला आणले होते. माझ्यावर ताईंनी मागासवर्गीय माणूस म्हणून अतीव प्रेम केले. शेकापच्या एक धडाडीच्या नेत्या म्हणून त्यांची ओळख होती. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री असताना त्यांनी जनहिताची अनेक कामे करून मंत्री म्हणून आपल्या कामाचा ठसा उमटविला. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!
– अशोक तानाजी गायकवाड, माजी समाजकल्याण सभापती राजिप



मीनाक्षीताई शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने आधार होत्या. शेतकरी, कष्टकरी, कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी त्यांनी कायमच लढा दिला आहे. महिला म्हणून त्यांनी खंबीर उभे राहून, गोररीबांसाठी त्या कायमच लढल्या.
– सुरेंद्र म्हात्रे, जिल्हाप्रमुख (उद्धव ठाकरे गट)



रायगडसह महाराष्ट्राच्या इतिहासातील फार दुःखद दिन आहे. त्यांनी आयुष्यभर कष्टकरी, कामगार व शेतकऱ्यांचा आवाज विधानसभेत बुलंद केला. लढाऊ घराण्यात जन्म घेऊन गोरगरीब, पीडित, कष्टकऱ्यांच्या हितासाठी लढा दिला आहे. महिलांचे प्रश्न सोडविण्याचे काम ताईंनी आमदारपासून मंत्री असताना केले आहे. ताईंच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली आहे.
– कॉ. भूषण पाटील, जेएनपीटीचे विश्वस्त



मीनाक्षीताईंनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात एक वेगळे काम केले आहे. ज्यावेळी मी शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करीत होतो, त्यावेळी त्यांचा प्रेमळपणा, आक्रमकता ही जवळून पाहिली आहे. त्या कायमच एक मार्गदर्शक म्हणून आदर्शवत ठरल्या आहेत. समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.
– महेंद्र घरत, जिल्हाध्यक्ष, काँग्रेस



माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनामुळे रायगड जिल्ह्यातील जनतेचे नुकसान झाले आहे. ताईंच्या जाण्याने कधीच न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. १९८० ते १९८२ च्या काळात आंबेपूर ग्रामपंचायतीच्या सरपंच असताना मी त्यांच्या हाताखाली कर्मचारी होतो. तेव्हापासून त्यांचे व पाटील परिवाराचे माझ्यावर संस्कार झाले व त्यातूनच मी घडलो. त्यामुळे मी आज या ठिकाणी पोहोचलो, त्यामुळे अनेक लोकांची सेवा करणाची संधी मला मिळाली.
– तुकाराम पाटील, मुरुड–वाणदे



शेतकरी कामगार पक्षाच्या व आपल्या सर्वांच्या झुंजार लाडक्या नेत्या माजी राज्यमंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाने शेतकरी कामगार पक्षाचे मातृतुल्य छत्र हरपलं. त्यांना माणगाव तालुका शेतकरी कामगार पक्ष, कृषी उत्पन्न बाजार समिती माणगाव व तालुका कुणबी समाजाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.
– रमेश पांडुरंग मोरे, चिटणीस, माणगाव तालुका शेकाप,

शेतकरी कामगार पक्षातील एक वटवृक्ष आज कोलमडल्याची भावना माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याची आहे. ताईंचा फारसा सहवास कधी मला लाभला नाही. परंतु, दरवर्षी शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापनदिनी ताईंची हमखास भेट व्हायची. त्यामुळे त्यांचा पक्षातील असलेला दबदबा आम्हाला जाणवत असे. त्यांच्यातील एक गुण म्हणजे, त्या छोट्यातल्या छोट्या कार्यकर्त्याला जवळ बोलावून विचारपूस करत असत. त्यांच्या जाण्याने फक्त शेतकरी कामगार पक्षाचे नाही, तर आगरी समाजाचेही नक्कीच नुकसान झाले आहे.
– प्रभाकर म्हात्रे (हरिओम)

मीनाक्षीताई यांच्या निधनाने कोकणावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या आमदारकीमध्ये माझ्यासारख्या सामान्य सरपंच म्हणून काम करणाऱ्या कार्यकर्त्याला नागपूर अधिवेशन दाखवणाऱ्या ताई या आमच्या नेत्या राहिल्या आहेत. त्यांनी रायगडमधील अनेक प्रश्नांना वाचा फोडून न्याय दिला आहे. सर्वसामान्य हनतेला न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अहोरात्र संघर्ष केला. त्यांचे भाषण नेहमीच स्फुर्ती देणारे ठरले आहे. जिल्ह्याच्या राजकारणात आणि समाजकारणात त्यांनी उमटविलेला ठसा अजरामर आहे. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाला शेवटपर्यंत भक्कम साथ दिली.
– बबन खाडे, मा. सरपंच संदेरी

मीनाक्षीताई माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांना सतत मार्गदर्शन करत होत्या. राज्यातील महिलावर्गाचे प्रश्न मांडणारी एक रणरागिणी या आपल्यातून निघून गेल्या आहेत. कार्यकर्ता म्हणून कसे वागलो पाहिजे याची माहिती त्यांच्या प्रत्येक भेटीत आदर्श मार्गदर्शक म्हणून कायम असायची. – श्रीराम राणे, तालुका चिटणीस शेकाप

सन १९९२ साली मी रायगड जिल्हा परिषदेवर सदस्य म्हणून निवडून आल्यावर मला पेझारीला राहण्यासाठी ठेवले. त्यावेळी रमजानचा महिना असल्याने मला रोजा धरण्यासाठी मीनाक्षीताई पहाटे लवकर उठून मला जेवण देत असत. अत्यंत मेहनती व मनमिळाऊ स्वभावाच्या असणाऱ्या ताईंची बहुजन समाजात विशेष अशी ओळख होती. सख्ख्या बहिणीप्रमाणे ताईंनी मला नेहमीच प्रेम दिले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.
– अस्लम इब्राहीम राऊत, ज्येष्ठ नेते शेकाप, मोर्बा–माणगाव

## मीनाक्षीताई, एक विश्वासू अंदाज

मीनाक्षीताई, एक विश्वासू अंदाज
महिला शक्ती भाली शोभे ताज
जरी दूर गेल्या, आपल्यातून आज
याद त्यांची, शेकापवर करील राज
एक विश्वासू अंदाज!
उपज त्यांच्यात महान संस्कारांची
छाप नाना पाटलांच्या आदर्शांची
समृद्धीला जोड अफाट बुद्धीची
दराऱ्यात विधानसभेत कामकाज
एक विश्वासू अंदाज!
सतत विषय हाताळती समाजाचा
ध्यास मनी असे, महिला उद्धाराचा
अन्यायाविरोधी, भास होई दुर्गेचा
त्यांना साथ देई, रयतेचा आवाज
एक विश्वासू अंदाज!
उरण–अलिबाग बांध जिव्हाळ्याचा
जिद्दीने उकल होई, साऱ्या प्रश्नांचा
कुणी प्रयत्न केला आड येण्याचा,
उत्तराला शब्दांच्या त्या तिरंदाज
एक विश्वासू अंदाज!
अभिमानाने नाव कोरले जाईल
दिल्या भाषणात, उदो उदो राहील
त्या कधी ना थकल्या, ना दमल्या
पाटीलशाही राखिली तर्रेबाज
एक विश्वासू अंदाज!
जातीभेद कधी ना त्यांना शिवला
धर्म जोखडात आवाज ना दबला
लोकशाहीचा शब्द–शब्द स्वीकारला
हिरकणी त्या, स्त्रीमनावर विराज
एक विश्वासू अंदाज!
**रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील, नवघर-उरण**

## रायगडची रणरागिणी

मी– मीनाक्षी तू अन् सरस्वती तू
ना– नारायणी अन् रणरागिणी तू
क्षी– क्षीर–निर हा विवेक तुझा
ता– तादात्म्य ही संस्कृती तुझी
ई– ईश तू पुजती अन् प्रजा तू पुजती
पा– पाईक तू जनसेवेची, माता तू या जनतेची
टी– टिकवी तू नातीगोती, कुटुंबवत्सल असे तू
ल– लक्ष साधना नित्य तुझीही, अभंग तू अन् अखंड तू,
आम्हा सर्वांचा होती आधार तू...
अशी सर्वांची लाडकी बेबीताई..!

## श्रद्धांजली

आपल्या कर्तबगारीने, जिद्दीने
अख्खा रायगड गाजविणाऱ्या
रणरागिणी म्हणजेच आमच्या
मीनाक्षीताई आमच्यातून गेल्या हे
खरंच वाटत नाही
वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून
आपण राजकारणाची धुरा अगदी
सहजपणे खांद्यावर पेललीत,
वाघिणीप्रमाणे काम केलंत
आपण झंझावाती वारा होतात
वादळं आली, तग धरणारा
आपल्या धडाडीच्या कामामुळे
आपण कायम आमच्या हृदयात
राहाल
अनेक सुवासिक फुलांत आपण
चाफ्याचे फूल होतात सुगंध देणारे
आपल्या कामाला मी सलाम करते
आणि ही श्रद्धांजली अर्पण करते
**- उज्वला दिघे, खोपोली**



माझ्या सभापतीच्या कारकीर्दीत ताईंना भेटण्याचा बऱ्याचदा योग आला. आम्हा तरुण मुलींसाठी ताई म्हणजे एक राजकीय मार्गदर्शिकाच होत्या. सर्व बाबींची परिपूर्ण माहिती, मराठी शब्दसमूहांचा अमाप साठा त्यांच्याजवळ होता. मराठी भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. बोलण्यात, विचार मांडण्यात करारीपणा, समोरच्याला त्या बोलत असताना त्यांचा ऐकतच राहावं असंच वाटायचं. आज त्यांच्या जाण्याने नक्कीच आम्हा नवोदित राजकीय महिलांच्या मार्गदर्शिका हरपल्याची भावना निर्माण होत आहे.
– दर्शना यशवंत म्हात्रे, माजी सभापती, पेण

रायगड जिल्ह्यात बोटावर मोजणाइतक्याच महिला लोकप्रतिनिधी झाल्यात. त्यामध्ये मीनाक्षीताई पाटील यांचं स्थान सर्वोच्च आहे. त्यांनी आम्हा महिलांना राजकारणात कसं वागायचं आणि कसं जनतेसमोर जायचं, तसंच अधिकाऱ्यांना जनतेप्रती आदबीने कसे वागवायचे, याची शिकवण दिली. आजच्या क्षणाला मी एवढंच म्हणेन, राजकारणातील एक करारी नेतृत्व हरपलं.
– स्मिता पेणकर, मा. सभापती, पेण

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रावर एक ठसा उमटविणाऱ्या, आपल्या कार्यकौशल्यातून व चौफेर फटकेबाजी करणाऱ्या अतिशय अभ्यासपूर्ण वक्तृत्व असलेल्या, निर्भीडपणे पुरोगामी भूमिका घेत आक्रमकपणे ठाम राहून, राजकारणात विरोधी वा सत्ताधारी असतानाही सातत्याने लोककल्याणकारी योजनांचा आग्रह धरून त्यासाठी कृतीशील उपक्रम राबविण्यात अग्रेसर असलेल्या, महाराष्ट्रातील आधुनिक जिजाऊ व सावित्रीबाई यांचा वसा चालवत असलेल्या तसेच मराठा सेवा संघ व आमच्या खेडेकर कुटुंबियांच्या कौटुंबिक स्नेही शिवमती मीनाक्षीताई पाटील यांचे निधन झाल्याची धक्कादायक व वेदनादायक बातमी समजली. एकेकाळी आम्ही नियमितपणे भेटत होतो. विविध विषयांवरील चर्चा रंगत होत्या. रेखाताई आमदार असताना मीनाक्षीताई पाटील सोबतच आमदार होत्या. यामुळे त्यांनी रेखाताईंनाही वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. अलिबागच्या खास जेवणाची चव आम्हाला चाखायला मिळाली. कोकणातील सौंदर्य व समस्या जवळून पाहता आले. किल्ले रायगड व पाचाड गाव येथील कार्यक्रमात अनेकवेळा त्यांचे सहकार्य लाभले होते. वडिलांचा लढवय्या स्वभाव व कार्य मीनाक्षीताई यांनी एक आदर्श वसा म्हणून जतन केला होता. भाई जयंत पाटील यांनी पाठराखण केली, साथ दिली. गेले सुमारे पाच वर्षे आमच्या गाठीभेटी झाल्या नाहीत. शिवमती मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनामुळे केवळ त्यांचे कुटुंबीय मंडळी नातेवाईक एवढेच नाही तर सर्वच महाराष्ट्र दुःखात सहभागी आहे. जिजाऊ सर्वांनाच सावरण्यासाठी बळ देवो हीच प्रार्थना.स्मृती शेष शिवमती मीनाक्षीताई पाटील यांच्या पावन स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली.
रेखाताई व पुरुषोत्तम खेडेकर,मराठा सेवा संघ व ३३ कक्ष

शेकापच्या रणरागिणी मीनाक्षीताई यांची जिल्ह्यातील एक धुरंदर नेत्या म्हणून ख्याती होती. त्या जितक्या जनतेच्या अन्यायाविरुद्ध आक्रमकपणे आपली भूमिका मांडायच्या, तितक्याच त्या प्रेमळ असल्याचे मी जवळून पाहिले आहे. एकदा लोकसभेच्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी मतमोजणी कक्षामध्ये सर्वांसाठी भाकरी–भाजीचे वाटप करताना त्यांना मी पाहिले आहे. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी, इतर वेळी प्रेमळ बहीण म्हणून ताई म्हणूनच त्यांची जिल्ह्यात ओळख होती. त्यांच्या आत्म्यास चिरशांती आणि सद्गती लाभो, ही प्रभूचरणी प्रार्थना करतो.
– उल्हासराव देशमुख, ज्येष्ठ नेते, खोपोली

आगरी समाजातील रणरागिणी म्हणून ख्याती असलेल्या झुंजार आणि लढवय्या नेत्या मीनाक्षीताईंनी ओघवते वक्तृत्व आणि अभ्यासू वृत्ती यामुळे राजकारणात आपली एक वेगळी छाप उमटवली होती. जि.प. सदस्या, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका, आमदार, मंत्री अशी त्यांची राजकीय कारकीर्द राहिली होती. राजकारणाबरोबरच पत्रकारितेमध्येही त्यांनी आपली ओळख निर्माण केली होती. आपल्या घराण्याचा राजकीय वारसा त्यांनी ताकदीने पुढे चालविला होता. त्यांच्या निधनाने आगरी समाजाची अपरिमित हानी झाली आहे. अखिल भारतीय आगरी समाजातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.
– सूर्यकांत पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय आगरी समाजिक संस्था

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
**- मुख्य संपादक**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे अंभेरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक प्रकाश पांडुरंग पाटील यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६२ | १/ड/२ | १-२०-०० | २-३६ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक :- ३०/०३/२०२४

**ॲड. संदीप हरिश्चंद्र मसणे**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता - ब्लॉक नं.१०१,कोर्ट व्ह्यू बिल्डींग, पहिला मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मोबाईल नंबर ९६०४५४५७७७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल सौ. रेश्मा रत्नाकर पाटील रा. जिते, तालुका-पेण जिल्हा रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत सदर जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. केशव जयराम मानकवळे रा. गणपती वाडी, पेण-रायगड यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी सुरु आहेत.
**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा रायगड, पोट तुकडी पेण, पंचायत समिती पेण, मे. दुय्यम निबंधक पेण यांचे कार्य क्षेत्रातील ग्रामपंचायत वरवणे, तलाठी सजा-धामणी मौजे वरवणे येथील जमिन मिळकतीचे वर्णन ७/१२ वरुन खालील प्रमाणे-

| गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| ११९ | १-४५-०० | २-८८ |

पैकी श्री. केशव जयराम मानकवळे यांचे हिश्श्याची ०-२५-०० हे.आर.चौ.मी. ही जमिन मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.
तरी वरील मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशीर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही नोटीस प्रसिध्द झाले दिवशी पासून ७ (सात) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.
जर सदर जाहीर नोटीसीस वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची जमिन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजुन माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.
पेण- रायगड.
दि. ३०/०३/२०२४.
सही
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६.
तळ मजला, शिवाजी पथ.
पेण, पेण- रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९.


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



कै. सौ. सुषमा संतोष मकाजी, पुण्य स्मरण, बोर्ली मांडला



सचिन हरिश्चंद्र घाडी, अलिबाग


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत जमीन मालक मे. झम झम प्लास्टीक तर्फ पार्टनर, मोहम्मद जाहिद झैनुल्ला अन्सारी व मोहम्मद झुबैर झैनुल्ला अन्सारी यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मांगरूळ, ता. पेण, जि. रायगड.**

| गट नं. | क्षेत्रफळ (आर. चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| १९ | २५.८०.०० | २५८.०० |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ३०/०३/२०२४

सही /-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६

सही /-
**ॲड. नरेश मारूती बैलमारे**
मो. ९८२३९७८७८५
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत जि. रायगड- ४१०२०१.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **विहिरी** - आपल्या शेतीवाडी बंगल्यात पाण्याच्या सोयीसाठी सिमेंट काँक्रीट रिंगाचे विहीर करून घेण्यासाठी व नळाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याची टाकीसाठी संपर्क रणजित पाटील- अलिबाग फोन- ९८३४३०३९४१/९८८१६३७०४७
- **इंग्लीश बोलण्यांतील अडथळे,** भिती खात्रीने घालवणार सोपा कोर्स. नंबर जपून ठेवा, गरज लागेल. ९८२२८४२८१०
- **फ्लॅटस विकणे आहेत.** अलिबाग येथे अगदी मोक्याच्या जागी असलेले, नवीन अजिबात वापर केलेला नाही असे दोन 2BHK फ्लॅट्स त्वरीत विकणे आहेत. किंमत- ७३ लाख आणि ८३ लाख. संपर्क : ८६९८६८२१२१ (एजंट क्षमस्व)
- **घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई** हवी पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८ ते ६ संपर्क - ९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- **चेंढरे अलिबाग येथे बंगला** with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६
- **मांडवा जेट्टी येथील घर** व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१




# अखेरचा हा ...दंडवत!



रायगडकरांची आजची संध्याकाळी जणू उदास झाली होती.. ‘अखेरचा हा तुला दंडवत’ गाण्याचे भारलेले स्वर, लालबावट्यात लपेटलेला देह, भावूक झालेला परिवार आणि कार्यकर्ते, अखेरच्या मानवंदनेसाठी पोलिसांनी झाडलेल्या बंदुकीच्या फैरी अशा वातावरणात मीनाक्षीताईंच्या पार्थिवाला पुत्र आस्वाद पाटील यांनी अग्नी दिला. तेव्हा अनेकांच्या अश्रूंचा बांध फुटला. शेकापची मुलुखमैदानी तोफ मीनाक्षीताई पाटील पंचत्वात विलीन झाल्या. समाजकारण आणि राजकारण या पल्ल्याड असणारी आमची माय आम्हाला पोरकी करुन गेली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली, तेव्हा सर्वांचेच डोळे पाणावले होते. शुक्रवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास मीनाक्षीताईंच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



●(सर्व छायाचित्र : समीर मालोदे)














शेकापच्या लढवय्या नेत्या



माजी राज्यमंत्री

श्रीम. मीनाक्षीताई पाटील यांना

भावपूर्ण श्रद्धांजली

शोकाकुल

कृषीवल

रायगडची रणरागिणी



श्रीम. मीनाक्षीताई पाटील

(माजी राज्यमंत्री)

यांना

भावपूर्ण श्रद्धांजली

शोकाकुल

ॲड. प्रविण मधुकर ठाकूर व परिवार


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)